# चैतन्य लहरी

अंक : १ व २ सन १९९८ जानेवारी, फेब्रुवारी



"नुसता माझा विचार केला तरी काम होईल मग समक्ष भेटायचे कशाला? तुम्ही जर मला तुमच्या हृदयात स्थान दिलेत तर तुम्ही नुसते खाली झुकलात तरी माझे तुम्हाला दर्शन होईल - भेटून काय करणार?"

**श्री माताजी निर्मलादेवी**

वाढदिवस पूजा (दिल्ली) दि. २१।३।८९

# अनुक्रमणिका


| नाव | पान क्र. |
|---|---|
| १) **नवरात्री पूजा**<br>कबेला ऑक्टोबर ९७ | ३ ते ८ |
| २) **रामनवमी पूजा**<br>कलकत्ता २१ मार्च ९१ | ९ ते १२ |
| ३) **शक्ती-पूजा**<br>दिल्ली ३.१२.९३ | १३ ते १७ |
| ४) **वाढदिवस पूजा**<br>दिल्ली १३.३.८९ | १९ ते २४ |
| ५) **श्री माताजींच्या भाषणातील उपदेश** | २, १८ |

## दुसऱ्यावर टीका करू नये.

"तुमच्या प्रवृत्ती बदला. दुसऱ्यामधे चांगले काय आहे ते पहाण्याचा प्रयत्न करा. पहायला शिका, मी इतरांचे बद्दल बोलत नाही. मला सांगायचे आहे की निदान सहज योग्यांचे बरोबर तुम्हाला असे करता येईल.' त्यांच्यात चांगले काय आहे ते बघायला शिका, सहज योगासाठी त्यांनी काय चांगले केले आहे, तुम्हाला त्यांच्याकडून काय मिळाले, आहे. त्यांच्या समवेत कसे रहायचे, त्यांच्यातील चांगले काय का दिसू नये? त्यांच्याशी चांगले वागून त्यांना प्रोत्साहन देऊन, तुम्ही सहज योगाला मदत करता."

- श्री माताजी २८-७-८५

"तुझ्या बांधवांच्या डोळ्यांतील कुसळ पहात असताना तुझ्या स्वतःच्या डोळ्यात असलेल्या मुसळाचा विचार का करीत नाहीस? दांभीक माणसा, प्रथम स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ काढून टाक. मगच दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ काढायचे तुला स्पष्ट समजेल."

- श्री येशू ख्रिस्त

"दुसऱ्याच्या दोषांचेकडे पहाताना आपल्यातील दोष वाढतात."

- श्री बुद्ध

".. तुम्ही एकाच आईची मुले आहात तर इतरांच्यापेक्षा तुम्ही उच्च स्थितीवर कसे जाऊ शकाल? नेहमी तुम्ही आईचीच . मुले असणार.

तुमच्या आईच्या नजरेत इतरांच्यापेक्षा तुम्ही उच्च कसे असाल? ते शक्य नाही. उलट अशा कल्पना करण्याचा प्रयत्न केल्यास . आई तुम्हाला शिक्षा देईल."

- श्री माताजी २८-७-८५

"स्वतःला आ॰ ॰प्त करण्याचा प्रयत्न करा. क्रोध, वासना, लोभ प्रत्येकावर नियंत्रण मिळवा, कमी खा, खादाड लोकांसारखे भरमसाठ खाऊ नका. एखादे दिवशी मेजवानीचे प्रसंगी तुम्ही जास्त खा, परंतु सारखेच जास्त खाऊ नये. ते सहजयोगयाचे . लक्षण नव्हे. कंट्रोल करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या बोलण्यावर कंट्रोल करा. तुमच्या बोलण्यातून क्रोध व्यक्त ह॰ोतो की खरी करूणा व्यक्त होते की तुमच्यात कृत्रिम कारुण्य आहे."

- श्री माताजी २१-५-८४

शिवाय माझी मुले असण॰ सोपे नाही, कारण तुम्ही काय करता ते मला समजते, तुमची प्रत्येक गोष्ट मला माहिती असते, मी तुम्हाला सुधार॰त असते ते तुम्ही जाणताच, परंतु जेव्हा तुम्ही मला धरून राहता तेव्हा असे दिसे की ज्यांनी उन्नत होण्याचा निश्च॰य केला आहे आणि आपल्या अंतर्यामी परिवर्तन करून अधिक चांगल्या स्थितीमध्ये उत्क्रांन्त होण्यात प्रयत्नशील ॰असणाऱ्यापैकी तुम्ही आहात, सहजयोगी असणे सोपे नव्हे, की तुम्ही पैसे दिलेत आणि सदस्य झालात आणि माता जीचे शिष्य झालात. माझे शिष्य झाल्यावरही तुम्हाला काही परीक्षांमध्ये उतरावे लागते आणि त्यासाठी मेहनत क रावी लागते. तुमच्या कुटंबामध्येच राहून पुष्कळ तपस्या करावी लागते.

- श्री माताजी

## आपण निरर्थक गप्पा मारू नये.

"इतरांवर सरकॅस्टीक (छदमीपणाने) मत प्रदर्शन करू नये. हा असाच आहे. तो तसाच आहे. एकमेकांवर असे मत प्रदर्शन करणे मला अजिबात आवडत नाही. तुम्ही सर्वांनी एकमेकांना आदर दिला पाहिजे. एखादी व्यक्ति गर्विष्ठ अथवा स्वार्थी असेल तर ते लगेच लक्षात येईल व त्याच्यावर उपाय केले जातील. म्हणून तुम्ही काही मत प्रदर्शन करू नका. सार्वजनिक कार्यक्रमाचे वेळीही मी असे बोलणे ऐकते ते फार वाईट आहे.

- श्री माताजी २४-३-८१

# नवरात्री पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे आदल्या दिवशीचे प्रवचन

कबेला : ऑक्टोबर ९७

आज सगळीकडे उत्साह दिसत आहे. नुसते करमणुकीसाठीच नाही तर आपल्याला भविष्याबद्दल काय करायचे, कसे करायचे इकडे लक्ष द्या. स्विस बँक प्रकरणे आजकाल माझ्या मनात फार घुटमळत आहेत. हे सर्व ते लोक कसे पचवू शकतात याची मला कल्पना नाही. आजकाल एका बाजूने लोक लोकशाहीबद्दल फार चर्चा करत आहेत. नवनवीन आकर्षक घोषणा करत आहेत अशा वेळी हे अवैध प्रकार राजरोसपणे कसे चालू शकतात? अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी त्यात गुंतलेल्या मंडळींना उघडे पाडण्यासाठी माझ्या मनात काहीतरी करायचे विचार आहेत; योजना आहेत. भौतिक प्रश्न बघितले तर ते कार्य चालू झाले आहे. जे देश खूप आधुनिक प्रकारात गणले जात होते त्यांच्याकडे मंदीची लाट आली आहेच. त्याच्यामुळे अति-उत्पादनाचे प्रश्न त्यांच्यासमोर उभे आहेत. भौतिकप्रवृत्ति बोकाळण्याचे कारण म्हणजे लोकांना हावरटपणाचे वेड लागले आहे. इंग्लंडमध्ये आम्ही घर शोधत होतो, बरीच घरे पाहिली पण सगळीकडे प्लास्टिकपासून बनवलेल्या वस्तूंचेच ढीग दिसत होते. फ्रान्समध्येही हीच तऱ्हा नको त्या वस्तूंचा नुसता संग्रह करण्याच्या व वापरण्याच्या सवयींमुळे आता त्यांना कुठे ठेवायचे, कसे सांभाळायचे हाच प्रश्न त्यांना भेडसावत असतो. भौतिकतेची ही धावपळ अखंड चालत असते. सहजयोग्यांनी या बाबतीत काय करावे हे मी आता सांगते. त्यांनी हस्तकौशल्यामधून बनवलेल्या वस्तूंना उत्तेजन द्यावे. मी जिथे जाते तिथे हातांनी बनवलेल्या वस्तु घेते. इतर प्लास्टिक वगैरेच्या वस्तू लोक कसे घेतात मला समजत नाही. झेकोस्लोव्हाकीयामध्ये मी हातांनी बनवलेल्या वस्तूंची लहान-लहान दुकाने पाहिली. सगळीकडे मला काहीतरी खरेदी करण्याचा आग्रह ते लोक करत होते. त्यांच्या कलाकुसरीच्या वस्तू सुंदर असूनही खपत नव्हत्या. सहजयोग्यांनी अशी शपथच घ्यावी की आम्ही हँडमेड वस्तूंचीच खरेदी करणार. ड्रेस घ्यायचा तरी हाताने त्यावर काहीतरी कलाकुसर केलेली हवी. गरीब लोकांच्या श्रमांचे त्यामुळे चीज होईल. लोकांना अगदी फालतू प्रकारच्या आणि वर त्रासदायक गोष्टींची कशी आवड असते समजत नाही. मी तर नॉयलॉन वगैरे कृत्रिम धाग्यांचे कपडे घालूच शकत नाही; थोडावेळ जरी नुसते मोजे घातले तरी सबंध शरीराला वेदना होऊ लागतात. म्हणून हाताने बनवलेल्या वस्तु वापरा. उदा. मातीपासून बनवलेल्या 'टेराकोटा'च्या वस्तु. मला तर त्या इतक्या सुंदर वाटल्या की मी त्यांची निर्यात करायचा निर्धार केला. नाही तर इथल्या लोकांना यंत्रापासून बनवलेल्या, अमेरिकेत बनलेल्या वस्तु घेण्याची फॅशन आहे. अमेरिकेतसुद्धा सिल्क, कॉटन आणि लेदरच्या वस्तु विकण्याची दुकाने (Out-Lets) असतात; पण लोकांना मोठमोठ्या स्टोअर्समध्ये जाऊन भव्य किंमत देऊनही महागड्या खरेदीचाच शोक जास्त. म्हणजे त्यांच्यात सूज्ञता नाही माणसांमधे ही सूज्ञता नसली तर सर्व प्रकारची हानीच होते.

आता लोकांमधे आयुर्वेद आणि होमिओपॅथी खूप पॉप्युलर झाली आहे. ॲलोपॅथिक औषधांचा त्यांना कंटाळा आला आहे. भारतातील डॉक्टर लोकांना मोठ-मोठ्या पगाराचे आमिष दाखवून परदेशातून बोलावतात आणि त्यांच्याकडून काम करवून, त्यांच्यात थोडाफार मामुली फरक करून, नवीन नाव देऊन विकतात; अशी ही औषधे फार धोकादायक व त्रासदायक असतात. मला एकदा ॲन्टिबायोटिक दिले गेले आणि पायांचे दुखणे मागे लागले. त्यात भर म्हणून आजकाल या फॅक्टरी व यंत्रामुळे प्रदूषण वाढले आहे. गांधीजी यंत्राच्या वाढत्या वापराच्या सतत विरोधात बोलायचे. आता गाड्या वापरायचे पण एक वेड आहे. अगदी जवळ जायचे असले तरी चालत जाणार नाही. म्हणून तब्येती बिघडतात. माझ्या लहानपणी आमची शाळा पाच मैलावर होती; घरात गाडी, बग्गी असली तरी आम्हाला चालत जायचीच सक्ति होती; सकाळी चालतच जायचे आणि येतांना गाडीतून यायचे ही शिस्त होती. वाटेत एक छोटा डोंगर पण होता. या सवयीमुळे आम्हाला निसर्गाचे ज्ञान व्हायला मदत झाली. गाडीतून जातांना सृष्टिसौंदर्य कळत नाही. आता लोकांची चालण्याची सवयच गेली आहे. मी या प्रकारांना सुधारणा म्हणत नाही, तर एक प्रकारची अधोगतीच आहे असे मी म्हणेन. देवाने पाय दिलेत पण आपल्याला चालता येईनासे झाले आहे. घरात जितकी माणसे तितक्या गाड्या असतात. स्पेनमधे इतक्या गाड्या असतात पण प्रत्येक गाडीत फक्त चालवणाराच. आपली स्वतःच काम करण्याची सवयच गेली आणि दुसरीकडे हे प्रदूषण वाढले. तसाच धुराचा त्रास खूप ठिकाणी वाढला आहे.

हे काही मी केलेले नाही आणि आता देवाकडे पावसाची मनधरणी करणे चालू आहे. माणसाच्याच सर्व चुका आणि देव का म्हणून पाणी देणार? तोच प्रकार वृक्षतोडीचा. पैसा मिळवायचा म्हणून झाडे तोडायची. हे प्रदूषण म्हणजे विनाशाची शक्ति (Destructive Forces) कार्य करायला लागल्याची लक्षणे आहेत. हे सर्वत्र चालणार आहे. म्हणून हाताने बनवलेल्या वस्तू वापरण्याची सवय करा. कपडेसुद्धा. या स्विसबँकेच्या लोकांनीही आधी ज्यू लोकांना पैसे देण्याचे कबूल केले होते पण आता चक्क नकार देत आहेत म्हणून माझा त्यांच्यावर राग आहे आणि आता त्यांनाही मी उघडे पाडणार (Expose) आहे. मेल्यावर हा पैसा ते बरोबर का घेऊन जाणार आहेत? त्यांना शिक्षाच होणार आहे. चीनमधील कॉन्फरन्समधेही मी या स्विस बँकेबद्दल हे स्पष्टपणे बोलले होते. मी तिथल्या अधिकाऱ्यांबरोबर मॅजिस्ट्रेटबरोबर याची चर्चा केली आहे आणि त्यांना हे सर्व प्रकार अवैध असल्याचे जाहीर करायला सांगितले आहे.

आजकाल सरकारी यंत्रणेचाच गैरफायदा घेऊन पैसा कमावणारे भ्रष्टाचारी लोक खूप झाले आहेत. त्या लोकांनाही स्विस बँकेत पैसा ठेवायचा नाद लागला आहे; मेल्यानंतर तो त्यांच्या मुलांनाही मिळत नाही. हे सर्व माणसाच्या अती हव्यासी वृत्तीमधून अंतर्गत बिघाड झाल्यामुळे होत आहे; आतूनच कीड लागावी तशी ही स्थिती आहे. आणि याला कारण माणूस धर्माला विसरला आहे हेच. त्याला वाटते बाह्य वस्तुंमधून त्याला आनंद मिळणार आहे; त्यामुळे संग्रहामागे संग्रह तो करत राहतो. तुम्ही म्हणाल माताजी पण घेत राहतात. पणी मी फक्त हातांनी बनवलेल्या वस्तु घेत असते. म्हणजे त्या कुणाला भेट देता येतील किंवा विकता येतील. तुम्ही दिलेले दागिनेही मी विकणार आहे, नाही तरी त्यांचा मला काय उपयोग आहे? मला बरेच आश्रम तयार करायचे आहेत, माझे घरातील दागिनेही मी विकणार आहे, म्हणून तुम्ही या हव्यासी प्रवृत्तीचा विचार करा. दुसऱ्यासाठी ते करायचे असेल, इतरांना आनंद द्यायचा असेल तर ठीक, पण एरवी हाव म्हणून स्वतःसाठी पैसे उडवण्यात काय अर्थ? दुसऱ्याला कसा॰ आनंद देता येईल हे पहा. तुमच्यामधे धर्म प्रस्थापित झाला आहे हे मूलभूत तत्त्व समजून घ्या. सहजधर्म तुमच्यामध्ये मुरला पाहिजे. ही भौतिक प्रवृत्ति त्याच्या अगदी विरोधात आहे. त्याच्यातूनच माफिया, स्विस-बँक इ. राक्षस निर्माण होतात. अनेक दुराचारी संघटना बनत जातात. तुम्ही सर्व मंत्र म्हणून मला आवाहन केले आहेच, पण तुम्ही स्वतः वर सांगितल्याप्रमाणे हातांनी बनवलेल्या वस्तूंव्यतिरिक्त इतर वस्तू न घेण्याचा निर्धार करा. त्याचप्रमाणे चालण्याची सवय करा, निसर्गाच्या जवळ जा. तुम्हाला या फुलांची नावे माहीत असली पाहिजेत. त्याचप्रमाणे या कलाकुसरीची कामे कुठे होतात, कशी होतात यासारखी बारीक-बारीक माहिती करून घ्या. या बाबतीत भारतीय व पाश्चात्त्य दोघेही कमी पडतात. उदा. भारतीयांना स्वयंपाक करता येत नाही. एकदा माझ्या पतीला चपाती बनवण्याची लहर आली आणि काय बनवले तर ऑस्ट्रेलिया, अमेरिका सारखे आकार असणाऱ्या चपात्या! माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की तुमची दृष्टि सूक्ष्म होऊ दे. प्राणी, वृक्ष, फुले यांच्यावर प्रेम करायला शिका. बेकार वर्तमानपत्रे वाचण्यात वेळ घालवू नका. देवीचा "कटाक्ष" जसा असतो तसे निरीक्षण करा. तिने नुसती एक नजर टाकली तरी तिला सर्व समजते. मला राना-वनांत खूप हिंडायची सवय होती, त्यामधून या पृथ्वीमातेने काय काय सौंदर्य पसरवले आहे ते ध्यानात येते. या स्टेजवरची आरास रशियन आणि इतर योग्यांनी किती कलापूर्ण दृष्टीने बनवली आहे हे तुम्ही पाहिलेत का?

आता हा कॉम्प्युटरचा प्रकार! तुम्हाला पत्र वगैरे लिहायचे असेल तर तो वापरा. पण एरवी हा खुळचटपणाच आहे. त्याने तुमचा मेंदू पूर्णतः अकार्यक्षम होणार आहे. म्हणजे ज्याचा वापर तुम्हाला करायचा आहे त्यामध्ये "मर्यादा" असते हे लक्षात घ्या. त्याच्या पर्यंतच रहा. पोहणे, घोड्यावर रपेट करणे या गोष्टींचा अतिरेक करू नका. "मला हे आवडते, ते आवडते" म्हणून त्याच्या मागे न लागता "मला हे शिकले पाहिजे, ते शिकले पाहिजे" असं म्हणायला शिका. तीच गोष्ट पैशाची. मला पैसा मोजता येत नाही, समजत नाही, खरेदी केलेल्या गोष्टी काय किंमतीच्या हेहि मला ठाऊक नसते. पण मला पैशाचा प्रश्न कधी येतच नाही. पैशाच्या मागे एकदा लागलात की तुम्ही त्यातच अडकून बसता. त्यावर उपाय हाच आहे की भौतिक हाव सोडून द्या. दुसऱ्याला देण्यात जो आनंद आहे, तो मिळवा. मी बाजारात गेले तर स्वतःकरता काहीही खरेदी करत नाही. तुम्ही मला अनेक भेटवस्तू देत रहाता, त्यांचे काय करायचे मला समजत नाही. आता ७५ वा जन्मदिवस झाल्यावर मी कसलीही भेटवस्तू न घेण्याचा निर्धार केला आहे. मला इतर अनेक प्रश्न सोडवायचे आहेत व मी त्या विचारातच गुंतले आहे.

म्हणून मी म्हणते की या सर्व प्रश्नांवर उपाय म्हणून तुम्ही स्वतःकडे बघायचे शिका. आपण त्यासाठी काय करत आहोत हे बघा. तुमचा कुणाचा स्विस-बँकेत पैसा नसणार याची मला खात्री आहे. पण जो पैसा तुम्हाला मिळत असेल त्याच्यात समाधानी रहा. जास्त पैसा मिळवायच्या मागे लागलात तर तो कुठे ठेवायचा हा प्रश्न पडतो. म्हणून प्रामाणिक आणि समाधानी रहाण्यामुळे तुमच्यासमोर काही समस्या येणार नाहीत आणि तुम्ही सुखात रहाल.

आता आणखी एक प्रश्न म्हणजे माफिया व त्यांचे धंदे. ही समस्या सरकारलाच नियंत्रण ठेवून सोडवायला हवी. या

देशात गरिबी खूपच आहे कारण सर्वांना टॅक्स खूप द्यावा लागतो. २६५ प्रकारचे टॅक्स वसूल केले जातात. त्यामुळे इथल्या कलाकारांच्या कौशल्याला किंमत नाही. फक्त ही डिझाईन करणारी मंडळी पैसे कमावतात आणि तोसुद्धा तुम्हा-आम्हाला मूर्ख बनवून. एकदा माझे पती कैरोला गेले होते तेव्हा त्यांनी माझ्यासाठी एक मफलर आणला. डिझाइनरने बनवलेला असं म्हणाले. मला तो भारतातच बनलेला वाटला. तसे त्याच्यावर लेबलही दिसले. २५ पौंडाला मिळाला! जो भारतात २ पौंडाला मिळतो. डिझानर मंडळींचा हाच धंदा. काहीतरी नवीन नाव देऊन लोकांना भुलवायचे आणि पैसा कमवायचा. याच्यावर उपाय म्हणजे पुन्हा तेच सांगायचे की हाव (greed) सोडून द्या; हाव ठेवली नाही की ज्याची खरोखरच जरूरी आहे ती वस्तु तुम्हाला सहज मिळणार; तुम्हाला मागायचीही जरूरी नाही. म्हणजे एक प्रकारे तुम्ही अलिप्त होता; असली तर बरेच, नसली तर उत्तमच. मग तुमचे चित्त कार्यक्षम होते; तुम्हाला स्पष्टपणे बोध होऊ लागतो; आणि तुम्ही योग्य त्या ठिकाणीच जाता. योग्य तीच खरेदी कराल. आता ही कार्पेटस् कुठली आहेत तुम्हाला माहीत आहे? ती रशियातील आहेत. मी तिथली फॅक्टरी पाहिली होती तेव्हा किंमत विचारली होती. त्या लोकांना निर्यात करण्याची काहीच माहिती नव्हती. आधी २० डॉ. म्हणाले आणि निर्यात करायची असेल तर २०० डॉ. भारतात उलटे असते. मग मी २० सहजयोग्यांना जाऊन विकत घ्यायला सांगितले. ते रशियन होते म्हणून त्यांना २० डॉ. ला मिळाले. अर्थ हा की 'समस्या म्हणून वाद वा विचार न करता, त्याच्यावर उपाय शोधायचा प्रयत्न करा. म्हणून हाव न बाळगता, खरेदी करायची असेल तर ती कुणासाठी हा विचार करा म्हणजे स्वतःमधील ही हाव सुटेल. मनाला अशी सवय लावा म्हणजे आनंद मिळवू शकाल. दानत वाढवली तर हाव सुटेल. आणि काय हवे ते नेमके मिळेल. आश्चर्य हे की, इतके चमत्कार पहायला मिळाल्यावरही तुमच्या लक्षात येत नाही की तुम्हाला ज्याची खरोखरच जरूर आहे ती पुरवली जात आहे.

आताच इंग्लिश लोकांनी चांगले नाटक सादर केले. ते नाटक मी पूर्वीच वाचलेले आहे. पण त्यांनी त्या नाटकातून माणूस भलत्या गोष्टींच्या मागे कसा लागतो, सहजयोगीसुद्धा कधी कधी कसा फसू शकतो हे फार चांगल्या तऱ्हेने सूचित केले आहे. तुम्ही सहजयोगी म्हणून फार काळजीपूर्वक राहिले पाहिजे हा चांगला संदेश त्यातून तुम्हाला मिळाला असेल. अहंकार आणि प्रति-अहंकार कसा सहजयोग्याला फसवतात हे पण त्यात दिसते. पाश्चात्त्य देशात अहंकाराचे परिणाम जास्त आढळतात. आपल्याला अहंकार झाला आहे हे मान्य करणे हाच त्याच्यावरचा उपाय आहे; मग तो आपोआप गळून जाईल. अशाच एका अहंकारी महिलेला मी विचारले तर कळले की तिला छान बाहुल्या बनवता येतात याचा अभिमान होता. डिझानिर लोकांनी बनवलेले विचित्र कपडे घालण्याच्या हौसेमधून प्रदर्शन करण्याचा अहंकारच दिसतो. म्हणून अगदी नम्र होऊन आपण या भौतिक गोष्टी आपल्याबरोबर घेऊन जाणार नाही हे समजून घ्या. तुम्ही संन्यास घ्या असं मी म्हणत नाही पण सहजयोगी म्हणून तुमच्या दृष्टीने त्या फालतू गोष्टी आहेत हे पक्के ध्यानात घ्या. आपण आत्मा झालो आहोत ही मोठी गोष्ट आपल्याजवळ आहे; आणि त्याचा आपल्याला अभिमान असला पाहिजे. तसे झाले की तुम्ही मूर्खासारखे वागणार नाही. तुम्ही आता परमेश्वराच्या राज्यातले संत आहात म्हणून कुणीही तुमच्यावर हुकूमत गाजवू शकणार नाही.

आता सहजयोगात लग्न झालेल्या लोकांना, विशेषतः महिलांना, मला एक विशेष गोष्ट सांगायची आहे. त्यांच्यापैकी काही जण फार आक्रमकपणा दाखवतात. लग्न म्हणजे काय? हनीमूनला खोल अर्थ आहे. "हनी" म्हणजे तत्त्व (Essence) मून म्हणजे शांति. म्हणून बायको जर भांडकुदळ, आरडा-ओरडा करणारी, हेकट असली तर पतीला फार त्रास होतो. पण संसाराचे मर्म (Honey) तिला कळले तर नवऱ्याला प्रसन्न कसे करायचे हे तिला कळेल; म्हणजे संसारात शांति मिळेल. सहजयोग्याने दुसऱ्याला आनंदच द्यायचा असतो. छोट्या छोट्या गोष्टींमधून त्याला हवा असणारा आनंद कपडे, वेशभूषा, इ. सुद्धा तुम्ही त्याला दिलात तर तोहि तसाच वागेल आणि तुम्हाला खूष करेल. पण सुरुवात पत्नीनेच करायला पाहिजे. कारण स्त्रियाच समाजाचा आधार असतात. पाश्चात्य संस्कृतीमधे स्त्रियांना हे शिकवतच नाहीत. म्हणून आपल्या कुटुंबातल्या मंडळींना खूष कसे करायचे हे तुम्ही प्रथम जाणून घ्या.

एक महिला होती, तिचे अमेरिकेतल्या माणसाबरोबर लग्न झाले होते. तिला अमेरिकेला जायचा चांगला चान्स होता. अर्थात अमेरिका म्हणजेही काही मोठी गोष्ट नाही, पण तिला वाटले फार मोठे झालो आणि ती फारच विचित्र वागायला लागली. मला कळले की ती न्यूनगंडाने पछाडलेली होती. माझ्याशी टेलिफोनवर बोलतानाही ती तिरकसपणा दर्शवायची. मला फार आश्चर्य वाटले. तिच्या बरोबर कुणीच पुरुष सुखात राहू शकणार नाही. तिला सोडचिठ्ठी द्यावी लागली. एखाद्या घोड्यावर बसल्यासारखी, चाबूक उगारणारी स्त्री कुणाही पुरुषाला पत्नी म्हणून आवडणार नाही. तिने लग्न तरी कशाला केले? सुख, आनंद, मिळवण्यासाठीच ना? मला हे बोलणे भाग पडते कारण पुष्कळ स्त्रियांची समजूत असते की आपण कोणीतरी महान आहोत. काहींच्या जवळ पैसा असतो, नोकरी-व्यवसाय असतो; पण त्यांचे पहिले कर्तव्य हे आहे की पति, कुटुंब आणि समाज

सुखात ठेवायचा. स्त्रीला जर पतीला सुखात ठेवता येत नसेल तर ती आपल्याला नकोच; ती चांगली सहजयोगी पण नाही. जसे नोकरी करणाऱ्या पुरुषाला साहेबाला खूष ठेवावे लागते आणि ते जर जमत नसेल तर त्याला नोकरीवरून काढून टाकले जाते. त्याचप्रमाणे स्त्रीलाही आपल्या पतीबरोबर प्रेमाने राहून त्याला समाधानी ठेवायला हवे. कारण तेच तिचे मुख्य कर्तव्य असते. तशी तयारी नसेल तर स्त्रीने लग्नच करू नये. हे पटवून देणे अवघड आहे. साधारण पुरुष स्वभावाने तापट असतात, उजव्या बाजूचे असतात. त्यांचा राग कसा दूर करायचा हे मी सांगितलेच आहे.

सिनेमातसुद्धा आजकाल प्रेमाच्या नावाखाली उच्छृंखलपणा दाखवतात. पण त्या वास्तविक गोष्टी नसतात. प्रत्येकीला मिळेल असे वाटणे चुकीचे आहे. तुम्हीच प्रथम शिकलं पाहिजे की पतीला आधी हृदयात बसवा. हे तुमचे कर्तव्यच आहे. नाही तरी तुम्हाला दुसरे काय करायचे असते? वरच्या गोष्टीतला पति या थराला गेला की मला म्हणाला "माताजी वाटल्यास मला ठार मारा पण मी त्या बाईला इथे राहू देणार नाही." ही खरी गोष्ट आहे.

आता पुरुषांना माझे सांगणे आहे की तुम्हाला अशी पत्नी मिळाली तर तिला समजून घ्यायचा प्रयत्न करा. तिचा काय प्रॉब्लेम आहे, ती असं का वागते याचा विचार करा. ती तुमच्यावर अधिकार गाजवते असे का होते? का तुम्हीच तशी समजूत करून घेतली आहे? जे पुरूष बायकांबद्दल तक्रारी करत असतात तेच स्वतः बहुतेक आक्रमक स्वभावाचे असतात. तुमच्यात काय कमी आहे म्हणून बायको तुमच्यावर अधिकार गाजवते? तुम्ही जर हे आत्मपरीक्षण करून पाहिले तर तुमच्या लक्षात येईल की तुम्ही तिच्यासाठी फार थोडा वेळ देता.

दुसरी बाजू कशी असते? एका बायकोला नवऱ्यापासून घटस्फोट पाहिजे होता. मी कारण विचारले तर तिने सांगितले की तो सारखा कामावरच जातो, वगैरे वगैरे सांगितले. त्यावर मी म्हटले की "जर तू घटस्फोट घेतलास तर तुला तो अजिबातच मिळणार नाही, मग घटस्फोट घेऊन काय मिळणार" मला हा प्रकारच समजत नाही. बायकांनी थोडी तरी अक्कल चालवायला नको का? आता पुरुषांनीही बायकोसाठी थोडा वेळ काढायला हवा. त्यांच्याकडे थोडेफार लक्ष द्यावे, त्यांच्या आवडी-निवडी जाणाव्या हेही जरूर आहे. मी माझेच एक उदाहरण सांगते. माझ्या पतीने माझ्यासाठी कधीही फुले आणली नाहीत. अगदी वाढदिवस वगैरे असला तरी मग माझ्या लक्षात आले की माझ्या पतीला फुलांबद्दल काहीच आकर्षण नव्हते. गुलाब वगैरेही ते जाणत नव्हते; मग वाटले फुले म्हणून ते Cactus सारखे भलतेच काहीतरी आणतील! मग त्यांनी फुले न आणलेलीच बरे असे मला वाटायला लागले आणि एक दिवस त्यांनी तसे कबूलही केले. म्हणून आपण सारासार विचार केला पाहिजे. पण पुरुषांची विचार करायची एक विशिष्ट तऱ्हा असते. आता पुन्हा मी माझेच उदाहरण देते. माझे पती माझ्यासाठी उगीचच भारी वस्तूंची खरेदी करायचे. मी त्यांना माझ्यासाठी काहीही घेऊ नका असे सांगितले पण ते म्हणाले तुला आवडत नाही का? तर मी सांगायचे "तसे नाही; पण उगीचच नको तेवढा खर्च करून भारी-भारी वस्तु घेणे मला आवडत नाही." तसेच त्यांना दुकानातून भारी स्वेटर्स घ्यायची फार आवड. अगदी २५० पौंड किंमत असलेलेही. माझ्याजवळ किती स्वेटर्स आहेत मलाच माहित नाही. मी म्हटले की स्विव्झर्लंडहून आपण मागवू, कारण तिथे खूप स्वस्त मिळतात. तसेच त्यांना माझ्यासाठी काश्मिरी कोट घ्यायची पण हौस. माझ्याजवळ तसे १०-१२ तरी असतील. ते काय मी मुलींना, नातवांना पुढे-मागे देणार आहे का? मग काय करणार? त्यांचा काही वाईट हेतू नसतोच. पण त्यांना ही खरेदी करणे समजत नाही हा मुख्य भाग. भारतात असताना, प्रथम पूजेला जाण्यासाठी ते माझ्याकरता साडी आणायला गेले. बरोबर भाचा पण होता. आणि सगळ्यात भारी किंमतीची साडी घेऊन आले. ती नेसून पूजेला जाताना मला फार त्रास झाला कारण ती खूप वजन असणारी साडी होती. (सर्व सहजयोगी खूप हसतात. श्री माताजी म्हणतात "मी अति-सौम्यः आणि अति-रौद्रः आहे) ती नेसून चालायचे, उठ-बस करायची महा कठीण काम. मग मी ती नीट घडी करून कपाटात ठेऊन दिली. मुद्दा हा की माझ्या पतीला साड्यांबद्दल काहीच ज्ञान नव्हते. ते समजून आल्यावर मी त्यांनी आणलेल्या साडीला कधी नावे ठेवली नाहीत. त्यांच्या देण्यामागची त्यांची भावना जाणणे व त्याची कदर करणे याला जास्त महत्त्व. (हे सर्व सांगताना श्री माताजी सारखे खूप मनमोकळेपणे हसत होत्या) मी पण त्यांच्यासाठी नेहमी सुटाचे कापड घेत राहते. एकदा ते म्हणाले मी स्वतःच माझ्यासाठी कापड घेतो; मी म्हटले ठीक आहे. पण त्यांनी असं विचित्र कापड घेतले की नवीन सूट घालून ऑफिसमध्ये गेल्यावर सगळे म्हणू लागले "साहेब, तुमची निवड अशी विचित्र कधीच नव्हती" मग ते म्हणाले "यापुढे मी पुन्हा कधी स्वतः कपडा-खरेदी करणार नाही; तूच माझ्यासाठी कापड घेत जा."

तात्पर्य हे की प्रश्न इतका साधा आहे की बायकांनी पतीला कसले कपडे आवडतात याच्यात थोडा जरी रस घेतला तरी बिघडत नाही. लोकांची मते पुरुषांना लवकर पटतात. एकदा मी आमच्या घरातील हॉलला सुंदरसा रंग लावून घेतला. तर त्याच्यावर ते एकदम खूप टीका करू लागले. मी म्हटले की उद्याची पार्टी झाल्यावर मग बघू. पण दुसऱ्या दिवशी पार्टीला आलेली प्रत्येक व्यक्ति त्या रंगाची स्तुति करू लागले, आणि ते

माझ्याकडे फक्त बघत राहिले. सगळं झाल्यावर दुसरा रंग लावायचे मी म्हटले तर ठामपणे नको म्हणाले. पुरुषांना लोकांच्या मताची फार काळजी असते. म्हणून पतीचे कौतुक लोक करतील हे जाणून तुम्ही काम करा, म्हणजे त्यांना पसंत पडते. या सर्व युक्त्या असतात. मी तर म्हणेन की पुरुष स्वभावतः सरळ मनाचे असतात पण तुम्ही त्यांना समजून घ्यायला हवे. कधी कधी ते रागावले तरी बिघडत नाही; बरेच वेळा दुसऱ्यावरचा राग तुमच्यावर काढतात. पण त्याचा फायदाच असतो कारण इतरांवर ते रागावले तर ते त्यांना त्रास देऊ लागतील. तुमचं तसं नाही म्हणून तुम्ही त्यांना नीट समजून घेतले तर सर्व ठीक होते. काही खराब नवरे असतात तशा काही खराब बायकाही असतात. अशा परिस्थितीत सहजयोगात घटस्फोट घ्यायला परवानगी आहे. म्हणून माझा हे सर्व सांगण्याचा उद्देश हा आहे की तुम्ही प्रत्येकाने एक सुंदर गृहिणी बनले पाहिजे; एक गृहलक्ष्मी बनले पाहिजे. हे सांगण्याचे कारण म्हणजे तुमचे सामूहिक गृहलक्ष्मी चक्र चांगले नाही आणि त्याचा मला त्रास होतो. गृहिणीची योग्य जबाबदारी पार न पडल्यामुळे हे होते.

आता स्विस स्त्रिया पहा. त्या तशा चांगल्या आहेत पण त्यांना स्वच्छतेचीच काळजी असते. स्वच्छता करण्याच्या धांदलीमधे तुमच्याशी पाच मिनिटेंसुद्धा बोलायला त्या तयार नसतात. तुमच्यासमोरही हे उचल, ते उचल, झाड-लोट सतत चालू. आता घरात थोडा पसारा पडलेला असला तर काय बिघडले? भारतात इतके करत नाहीत. पण पाश्चात्यांच्या घरात वेगळेच. सारखे मशीन आणि स्वच्छता. पाहुण्याच्या समोरच जरा कुठे ग्लास फुटला की बाप रे! हासुद्धा एक सूक्ष्म भौतिकपणाच आहे. पाश्चात्य महिलांना हे कधीच समजणार नाही. भारतामधे एखाद्या घरी गेलात तर त्यांची रंगाची कल्पना वेगळीच दिसते. तिथेही दक्षिण भारतामधे वेगळीच रंग-संगति. प्रत्येकाची आवड वेगवेगळी असते. पण पाश्चात्य बायका कुणाच्या घरी गेल्या गेल्याच प्रथम रंगाबद्दल चर्चा वा टीका सुरू करतात. याचे कारण म्हणजे ते लोक दुसऱ्यांच्या भावनांची कदर करत नाहीत. महिलांनी विशेष करून दुसऱ्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत. तसेच पाश्चात्य महिला भारतीय लोकांच्या घरी गेल्या तर तिथे मजेत जेवतील पण असं दाखवतील की जेवणाचे पदार्थ हलक्या प्रकारचे आहेत. पाश्चात्य संस्कृतीतच ही टीका करण्याची सवय असते. कुणी व्यक्ति भेटली तर प्रथम त्याच्या कपड्यांबद्दल शेरे मारतील. चांगल्या घराण्यांतले भारतीय लोक असं करणार नाहीत. आता आजकाल भारतातील लोकही मॉर्डन बनू लागले आहेत म्हणा. अशा बोलण्यामुळे आपण दुसऱ्याचे मन दुखावते. स्त्रीने या बाबतीत काळजी घेतली पाहिजे. दुसऱ्याचे घर, दुसरीची साडी, याबद्दल चागले बोलण्याने काही बिघडत नाही. हे खोटे बोलण्यासारखे वाटू नये. "I don't like this" ही भाषाच सहजयोगात बंद झाली पाहिजे. मी जर तसं बोलू लागले तर किती लोक सहजयोगात उरतील? म्हणून या सवयी सोडून देणे फार महत्वाचे आहे.

आता अमकं आवडते, तमकं आवडत नाही असे म्हणणारे तुम्ही तरी कोण आहात? तुमचं हृदय काय म्हणते, तुमचा आत्मा काय म्हणतो. म्हणजे पुन्हा तेच बोलणे आले की स्त्रियांनी आपल्या हृदयाकडे लक्ष द्यायला शिकावे, हृदय विशाल करावे; त्यांची गुरू ही आई आहे, तसेच प्रत्येक स्त्रीने सुंदर माता, सुंदर पत्नी बनले पाहिजे. म्हणजे सर्व स्वार्थ, सर्व प्रश्न संपतील, बँकासुद्धा बंद पडतील; त्यांचे काम चालते कारण तुमचे हृदय लहानच असते. ते विशाल झाले की काम संपणारच.

सहजयोगी महिलांबद्दल हे इतके सांगत आहे कारण माझ्याकडे त्यांच्याबद्दल खूप तक्रारी येतात. विशेषतः लग्न झालेल्या आणि त्यात काही भारतीय महिला पण आहेत. रशियातील महिलांबद्दल मात्र मुळीच तक्रारी नाहीत. सर्वांत त्या चांगल्या आहेत, समाधानी आहेत. त्यांच्या गरजा फार कमी असतात, त्यांना कसली हाव नसते. कम्युनिझममुळे त्यांचा हा फायदा झाला असावा. किंवा कम्युनिझम टोकाला गेल्यामुळे त्यांच्यामध्ये स्वतःकरता मिळवण्याची भावनाच उरलेली नसते. मग कार असो की फ्लॅट असो. आपल्या नावाचे असणे डोकेदुखीच असते. त्या लोकांना हे आपल्या मालकीचे आहे अशी जणु जाणीवच नसते. अर्थात त्यांच्याकडेही काही विचित्र लोक आहेत म्हणा. त्यांच्याकडे सुधारणेच्या (!) नावाखाली बरेच बदल झाले, शहरातून महागाई खूप वाढली. पण एकंदरीत, विशेषतः त्यांच्या महिला खूप चांगल्या आहेत. रुमानियातल्या मुलीही चांगल्या आहेत. आता सगळे लोक रशिया किंवा रुमानियाचा जोडीदार हवा असे म्हणू लागले आहेत. आज त्यांच्याकडचे कोणी येऊ शकले नाहीत म्हणून त्यांची खूप आठवण येत आहे.

श्री. अरुण आपटे यांनी संगीत आणि सहजयोग हे एक फार छान पुस्तक लिहिले आहे. सगळ्यांनी ते वाचलेच पाहिजे. भारतीय संगीत ॐ कारपासून निर्माण झाल्याचे व त्याचे पुढचे आजपर्यंतचे सर्व शास्त्र याची सविस्तर हकीगत त्यात आहे. पाश्चात्य संगीताचे बरेच कलाकार आपल्याकडे आहेत. वाद्ये छान वाजवतात; पण पाश्चात्य संगीतामधे गोडवा (melody) कमी असते, त्यांना वाटते की त्यांचे संगीत हृदयातून गायचे असते, हृदयातील भावना व्यक्त करायच्या असतात. उदा. विरह, नैराश्य, प्रेम अशा भावना अशा तऱ्हेने व्यक्त करतांना त्यात एक प्रकारची कृत्रिमता येते; गाण्याच्या शब्दात तुटक-तुटकपणा वाटतो. म्हणून ते प्रवाही होत नाही. रशियन संगीत, विशेषतः त्यांचे लोकसंगीत फार गोड असते. आता अमेरिकन लोकही

तिकडे वळू लागले आहेत. संगीत खरं म्हणजे मनोरंजना बरोबरच ते ऐकणाऱ्याला स्वच्छ करणारे असले पाहिजे. तुम्हाला त्यातून आनंद, समाधान मिळायला हवे. तुम्ही सहजयोगी असल्यामुळे "मला अमका-अमका त्रास आहे" असं न म्हणता "मला थोडा प्रॉब्लेम आहे पण मी तो लवकरच सोडवणार आहे" असे म्हणत जा. तुम्हाला विजय मिळवायचा आहे. ते तुमच्या संगीतामधून कळले पाहिजे. इतर गाणारे रडतात, ओरडतात, त्यात गोडवा नसतो. तुटक-तुटकपणा वाटतो. त्यांचा वाद्यवृंदही असाच. भारतीय संगीत आणि वाद्यकला फार गोड आहे. नदीच्या पाण्यासारखे ते वाहते असते. मला पाश्चात्य संगीत कलाकारांना सांगायचे हे की त्यांच्या गाण्यातले शब्द ऐकणाऱ्याला कळले पाहिजेत व त्यात गोडवा आला पाहिजे. भारतीय संगीत फार कर्णमधुर असल्यामुळे अर्थ कळला नाही तरी ऐकणाऱ्याला गोडवा वाटतो. म्हणून पाश्चात्य संगीतात गोडवा, माधुर्य आणले तर खूप फरक पडेल. हे पुस्तक प्रत्येकाने घ्या, वाचा, अर्थ जाणून घ्या म्हणजे संगीत उत्साहवर्धक, आनंददायक कसे होते हे तुम्हाला कळेल. भारतीय संगीत शिकल्यावर पाश्चात्य संगीत कलाकारांची कला जास्त बहरेल. पाश्चात्य संगीत कलाकार प्रसिद्धी मिळवतात, पैसा मिळवतात– अमेरिकेत कुणीही पैसा कमवू शकतो– पण ज्याला खरे संगीत शिकायचे असेल त्याने भारतीय संगीत शिकलेच पाहिजे. म्हणून हे पुस्तक जरूर खरेदी करा.

आज नवरात्रीचा चौथा दिवस आहे. तुम्ही देवीची विविध नावे घेतलीत. त्यांची रचना ज्यांनी केली त्यांना फार हालात दिवस काढावे लागत होते म्हणून त्यांनी देवीची प्रार्थना करून तिला त्या राक्षस-लोकांना ठार करण्याची विनंती केली. एका दृष्टीने असे ठार मारले जाणे हाही निसर्गनियम आहे. तुम्ही लोकांनी सतर्क राहून प्रगती केली तर तुम्हीही खूप साध्य करू शकाल. तुम्ही नसत्या गोष्टींच्या व पैशाच्या मागे न लागता आपल्या गरजा कमी करून निसर्गाप्रमाणे रहाल तर हे कार्य होईल याची मला खात्री आहे. तसेच या भूमातेवर प्रेम करा; तीच ते सर्व घडवून आणेल. आता कोणी चर्चमधे जात नाहीत. त्यासाठी मी काही केले नाही तर भूमातेनेच सर्व घडवून आणले. आता इंडोनेशिया आणि त्याबाजूचे लोकांना सर्वांना धुरात्रा त्रास होत आहे. मी यातही काही केले नाही. कारण तुम्ही चुकीच्या गोष्टी केल्या की त्या तुमच्यावर उलटणार. क्रिया आणि प्रतिक्रिया हा निसर्गातील नियमच आहे. म्हणून सहज हाच तुमचा स्थायीभाव असला पाहिजे. तुम्ही कंटाळलेले, वैतागलेले असे दिसता कामा नये. 'सहज'च्या मूडमधेच असावे.

मी आज खूपच बोलले. उद्या मी येऊ शकणार नाही. तुम्ही विश्वासाने जाणून घ्या की माताजी आपल्यावर प्रेम करतात, आपणा सर्वांचे एक सुंदर कुटुंब असावे अशी त्यांची इच्छा आहे. त्या आपल्याला आपल्या मुलांची काळजी घ्यायला सांगतात. म्हणून मी पुरुषांना आणि महिलांना दोघांना उपदेश केला.

ooo

## आपल्या बोलण्यात किंवा वागण्यात दुराग्रह (फॅनॅटिकल) असू नये.

"आता काही लोकांच्यावर एखाद्या धार्मिक कृत्याचा प्रभाव पडतो. उदा. मी पाहिले आहे की काही सहज योगी पूजेला येतात, तेव्हा बंधन घेतात, रस्त्यांत चालताना बंधन घेतात, कोठेही गेले तरी वेड्यासारखे बंधन घेतात, हे निव्वळ कंडिशनिंग आहे, तारतम्य नव्हे, सहज योग नव्हे, बंधन घ्यायचे की नाही हे नीट पहायला हवे. आईच्या समोर बंधन असतेच तर मग स्वतःला बंधन देण्यासारखे त्यात काय आहे? पण, मी बोलत असते त्यावेळीही लोक कुंडलिनी चढवतात, बंधन घेतात, मला वाटते ते वेडेच आहेत."

- श्री माताजी १०-७-८८

"तुम्ही पहाल, तर, अजूनही प्रत्येक धर्मात अनेक कर्मकांडे चालू आहेत. अवतरणाच्या मृत्यू नंतर लोकांनी कर्मकांडांना सुरुवात केली. श्रीकृष्णांच्या मृत्यूनंतर लोकांना समजेना की आता काय करावे. कारण कर्मकांडे असू नयेत असे त्यांनी सांगितले होते

परिणामतः त्यांचा अवतार संपल्यानंतर लोक गंभीर स्वभावाचे झाले आणि धर्मामध्ये गांभीर्याला व सर्व कर्मकांडांना सुरवात झाली. लोक अतिशय कर्म कठोर झाले आणि त्याच्याबरोबर जीवनातला आनंद निघून गेला व इतर अनेक गोष्टींची सुरवात झाली. धर्मातील अनेक कर्मकांडाच्या खुळचटपणाला पायबंद घालण्यासाठी श्रीकृष्णांचे आगमन झाले होते त्याचे अवतरण फार महत्त्वपूर्ण होते पण किती लोकांना ते समजले आहे हे माहिती नाही. ही सर्व लीला आहे,परमेश्वराचा खेळ आहे, हे दाखवून देण्यासाठी ते आले होते. त्यात गंभीर होण्यासारखे काय आहे? कर्मकांड होण्यासारखे काय आहे? परमात्म्याला कोणत्याही कर्मकांडात तुम्ही बांधू शकत नाही. म्हणून स्वतःला कोणत्याही कर्मकांडात तुम्ही बांधू शकत नाही. म्हणून स्वतःला कोणत्याही कछर्मकांडात बांधून घेऊ नका, हे सांगण्यासाठी ते पृथ्वीवर आले होते."

- श्री माताजी

# श्री रामनवमी पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

कलकत्ता : २५ मार्च ९१

रामनवमी साजरी करण्यासाठी आज आपण इथे जमलो आहोत. श्रीरामचंद्राबद्दल आम्हाला काही सांगा असे मला सांगितले गेले. आपल्याला माहीत आहेच की आपल्या संस्कृतीमध्ये श्रीरामांना फार ऊच्च मानतात. आपल्या वडिलांबरोबरच्या संबंधात कर्तव्य किंवा प्रेम याबद्दल आपण कमी पडलो तर हे चक्र खराब होते. श्रीराम पूर्णपणे मानव स्वरुपात पृथ्वीवर आहे; आपण श्रीविष्णूचे अवतरण आहोत हेहि त्यांना स्मरण नव्हते, किंवा तशीच योजना होती. पण सर्व संसारामध्ये "पुरुषोत्तम" असे त्याचे स्थान आहे. त्यांचे बालपण, त्यांचे विशेष गुण तुम्हाला माहीत आहेच. पण सहजयोगी म्हणून आपण लोकांनी हे समजून घ्यायला हवे की आपण ज्या देवतांची आराधना करतो व त्यांना मानतो त्यांचे कोणते गुण आपल्यामध्ये प्रत्यक्षात उतरले आहेत? श्रीराम पुरुषोत्तम असल्यामुळे त्यांच्यामध्ये अनेक अलौकिक गुण होते; पण त्यातला महत्त्वाचा एक गुण म्हणजे राजकारण करताना लोकमताचा त्यांनी आदर केला; त्यापायी आपल्या पत्नीचा त्याग केला. आजकालच्या आपल्या राजकारणी लोकांच्या हे लक्षात आले तर त्यांचा स्वार्थ नाहीसा होईल; ते धर्मपरायण होतील. पण श्रीरामांचे अनुकरण करण्याचा कोणी प्रयत्नच करत नाहीत. त्यांची मंदिरे बांधली गेली, उत्सव झाले, भजने झाली पण या सर्वांमधून श्रीराम आपल्यामध्ये स्थापित होणार आहेत का? आपल्या जीवनात त्यांचा प्रकाश येईल का? फक्त सहजोगीच श्रीरामांचा प्रकाश आपल्या चित्तामध्ये मिळवू शकतील. श्रीराम अत्यंत निरपेक्ष होते. सर्व देव-देवता पाप-पुण्याच्या कल्पनांपासून दूर असतात; सामान्य मानव ज्याला पाप समजतात अशा कृत्यापासूनही त्यांना पापाची बाधा येत नाही. उदा. श्रीकृष्णांनी अनेक राक्षसांना ठार केले किंवा श्रीरामांनी रावणाचा वध केला अशा गोष्टी सामान्य व्यवहारात पाप म्हणून जाणल्या जातील पण परमात्म्याच्या दृष्टीने ते पाप होत नाही. कारण त्यांनी दुष्ट शक्तींचा नाश केला; विनाशकारी प्रवृत्तींचा नाश केला आणि तो अधिकार त्यांना होता. तसेच देवीने राक्षसांचा संहार केला हेसुद्धा पाप नव्हते कारण राक्षसांचा संहार हेच तिचे कार्य होते, संतांचे संरक्षण हेच तिचे कार्य होते. श्रीरामानी आपल्या जीवनात अहिल्येचा उद्धार केला. अहिल्येला पतीकडून शाप मिळाल्यामुळे ती शिळा बनली; त्याकाळी स्त्री जर वाममार्गाकडे वळली आणि तिचा पति कोणी ऋषी असला व ती स्वतः उच्च स्थितीला आलेली असती तर तिला पतीचा शाप भोगावा लागत असे. पण अहिल्येवर तर खोटाच आरोप लागला गेला आणि ती शिळा बनली. श्रीरामांनी तिचा उद्धार केला. त्याचप्रमाणे आपल्या पत्नीबाबतचे जे त्यांचे एकपत्नीव्रत होते ते अनुकरणीय आहे. सीतादेवी साक्षात् महालक्ष्मी आहे हे त्यांना माहीत होते, तरीही मानव स्वरूपात आल्यावर त्यांनी दुसऱ्या कोणी स्त्रीकडे वाईट दृष्टि कधी टाकली नाही. म्हणून श्रीरामाबद्दल नुसतं बोलतांनाही आपल्यामधील पति-तत्व स्वच्छ आहे का हे आपण बघितले पाहिजे. तसेच सीतेच्या मनात श्रीरामांबद्दल जी श्रद्धा होती तीच प्रत्येक स्त्रीच्या मनात आपल्या पतीबद्दल असायला हवी. तसेच प्रत्येक पुरुषानेही श्रीरामासारखे एकपत्नीव्रत सांभाळले पाहिजे. सहजयोग्यांना हे कठीण नाही. पुरुषांनी पत्नीचा आदर केला पाहिजे. रावणाने सीतेचे अपहरण केल्यावर तिची सुटका करणे हे आपले कर्तव्य आहे असे श्रीरामांनी मानले; पण त्याच सीतेची लोकनिंदा सुरू झाल्यावर त्यांनी तिचा त्यागही केला इतके ते संतुलित व्यक्तिमत्त्वाचे होते. अर्थात सीता साक्षात् देवी असल्यामुळे तिचा त्याग केल्याचा काही विशेष परिणाम होण्याची शक्यता नव्हती पण लोकनिंदा झाल्यावर आपल्याबद्दल प्रजेच्या मनांत जराही संदेह नसला पाहिजे या आदर्श राजाच्या कर्तव्यानुसार त्यांनी सीतेचा त्याग केला. सीता निष्कलंक होती, देवीस्वरूप निर्मळ होती; तिचा त्याग झाल्यावर तिनेही एक प्रकारे पतीचा त्याग केला. तिने स्त्री म्हणून श्रीरामांचा त्याग केला आणि श्रीरामांनी पुरुष म्हणून तिचा त्याग केला. शेवटी सीता धरणीमातेत विलीन झाली आणि श्रीरामानी शरयू नदीमध्ये देहत्याग केला.

अशा प्रकारे श्रीरामांचे जीवन घटनामय व चमत्कारपूर्ण होते. त्या पति-पत्नीचा एकमेकांबद्दलचा भाव श्रद्धामय होता. आपला त्याग केला हे श्रीरामाचे परम कर्तव्य होते हीच सीतेची भावना होती म्हणून तिने पतीविरुद्ध काहीच तक्रार केली नाही आणि अत्यंत निष्ठेने मुलांना जन्म दिला, त्यांचे पालन पोषण व संगोपन केले. त्यांचे लव-कुश हे दोन पुत्र भक्तस्वरूप होते. त्यांच्यामधले शिष्यत्वाचे गुण बघायला हवे. शिष्यत्व हीसुद्धा एक शक्ति आहे व त्याचे ते द्योतक होते. छोट्या वयातच त्यांनी धनुर्विद्येत पारंगता प्राप्त केली आणि रामायण व संगीतामध्येही प्राविण्य मिळवले. याचा अर्थ हा आहे की शिष्य आपल्या गुरूला पूर्णपणे समर्पित असला पाहिजे. हे शिष्य-स्वरुप तुमच्यामध्येही प्रस्थापित झाले आहे. तसेच मातेबरोबरही, जी

शक्ति होती. ते पूर्णपणे समर्पित होते; तिच्यासाठी श्रीरामाबरोबर युद्ध करायला ते तयार होते. माता ही त्यांच्या मनामधील विश्वातील सर्वोत्तम भावना होती आणि सीतेनेही आपल्या मुलांचे संगोपन, शिक्षण आणि मुलांना धर्मतत्त्वामध्ये प्रस्थापित करणे हेच आपले एकमेव कर्तव्य मानले. आजकालच्या स्त्रिया नवऱ्याने टाकले म्हणून रडत बसतात, आणि आपल्याला मुलांना सांभाळायचे आहे, वाढवायचे आहे याच्याकडे दुर्लक्ष करतात. सीतेने दाखवलेली वीरता व साहस हे प्रत्येक स्त्रीने आपल्यामधून प्रकट केले पाहिजे. पतीने सोडले म्हणून काही झाले तरी आपले व मुलांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, आपल्या मुलांचे संगोपन हेच परम कर्तव्य समजून सहजयोगामधून ही शक्ति प्राप्त करून घेतली पाहिजे.

श्रीरामाचे स्वतःचे जीवनही अत्यंत शुद्ध व पवित्र होते. सीतेचा त्याग केल्यावर त्यांनी पण राजप्रासादातील सर्व ऐष-आरामांचा त्याग केला. इतकेच नव्हे तर जमिनीवर दर्भशय्येवर झोपू लागले, अनवाणी फिरू लागले, संन्यस्त साधू सारखे जीवन व्यतीत करू लागले. हे सर्व कथा नव्हे तर सत्य आहे. आपल्या देशात असे अनेक आदर्श निर्माण झाले ज्यांचे जीवनचरित्र अत्यंत ऊच्च श्रेणीचे होते, त्यांनी क्षुल्लक दर्जाचे विचारच केले नाहीत. पण दुर्दैव हे की ह्या सर्व आदर्शांकडे आपण पाहतो तेव्हा एक ढोंग आपल्या मनात तयार केले आणि ते म्हणजे "आपण रामाला मानतो म्हणून त्यांचे भजन-पूजा करतो" एवढीच स्वतःची वृत्ति बनवतो. हा ढोंगीपणाच फार वाढत गेला. ज्या देशांमध्ये असे आदर्श नव्हते तिथले लोक आदर्श बनण्याचा प्रयत्न करतात. पण इकडे आपल्याकडे म्हणतात "राम आदर्श होते, आम्ही त्यांच्यासारखे कसे होणार?" हाच प्रकार कृष्णाबद्दल आणि इतर महान पुरूषांबद्दल. पण आपल्यामध्ये जर राम आहेत तर त्यांचा प्रकाश आपल्या चित्तामध्ये यायलाच पाहिजे. तो कां नाही येणार? आपण ती स्थिती का नाही प्राप्त करू शकणार? आपण तसा प्रयत्न करायला हवा. सहजयोगी म्हणून आपण हे लक्षात घेतले पाहिजे की श्रीरामांसारख्या स्थितीतील आपण आलो तर सारे राजकारणच संपून जाईल. जेव्हा सर्व सहजयोगी असे ठामपणे म्हणू शकतील की आमच्यामधे श्रीरामाचा प्रकाश आला आहे तेव्हां आपल्या सर्व समस्या संपून जातील. राजा म्हणून श्रीराम जे करत होते ते अगदी निरीच्छ भावनेने, एक विदेही जीवनासारखे करत होते; आणि त्यामुळे साऱ्या प्रजेमधे धर्म प्रस्थापित झाला; त्यांना चांगली शिक्षा मिळाली, त्यांची उन्नति झाली, त्यांच्यामध्ये आदर्श प्रस्थापित झाले. हाच श्रीरामांचा ध्यास होता व त्यासाठीच त्यांना स्वतःचे जीवन आदर्शरूप ठेवावे लागले. तुम्हाला कुणीतरी उपदेश करू लागला आणि तो स्वतःच त्याविरूद्ध वागणारा असला तर त्या व्यक्तिबद्दल तुमच्या मनात कधीच आदर राहणार नाही; तुम्ही त्यांचा उपदेश मानणार नाही. पुष्कळ लोक म्हणत असतात की आम्ही अमक्या अमक्या महाराजांना वा देवतेला मानतो पण त्यांचे वर्तन त्या दैवताप्रमाणे अजिबात नसते. रामाला मानणारे राजकारणी चोर-भ्रष्ट असतातः त्यांना एकाहून जास्त बायका असतात; मग रामाला मानण्यात काय अर्थ?

या दृष्टीने सहजयोग्याचे जीवनातील कर्तव्य काय हे आता पाहू. सहजयोग्यांनीही देव-देवतांचा प्रकाश आपल्या चित्तामध्ये आणायला हवा. प्रत्येक बाबतीत प्रत्येक प्रसंगी श्रीरामासारखे आचार-पालन केले पाहिजे. प्रत्येक वेळी श्रीरामांनी किंवा सीतादेवींने काय केले असते हा विचार आधी करा. सहजयोगिनी जर असे करू लागली तर ती घरामधली गृहलक्ष्मीच बनेल. आपल्या सर्वांना माहित आहे की सीतेने नंतर अनेक जन्म घेतले. गृहलक्ष्मी म्हणून फातिमा स्वरूपात सीतादेवीच आली. घरीच सर्वकाळ घुंघट ओढून ती रहात होती पण तिच्यामधील शक्ति सर्व कार्य करत होती. घराबाहेर पडून भाषण देण्याची, लीडर बनण्याची तिला मुळीच जरूर नव्हती. तुम्हीसुद्धा घरीच राहून आपली मुले-बाळे, नातेवाईक, आप्तेष्ट इ. ना सहजयोग देण्याचे काम करू शकता. पण तुम्ही प्रथम ती स्थिति मिळवली पाहिजे; नंतर आपण समाजात तेच कार्य करू शकाल. स्त्रियांनी पहिल्याप्रथम सीतादेवीसारखे शुद्ध आचरणशील बनले पाहिजे. शुद्ध आचरणाची पहिली गोष्ट म्हणजे प्रेम आणि ममता. वनवासामध्येसुद्धा सीता रामाबरोबर काहीही न मागता राहिली. आजकालच्या स्त्रिया नवऱ्याजवळ सारख्या मागण्या करत असतात. सीता रामाबरोबर सतत राहिली, वनामधेही जसे राम राहिले तशी. प्रथम काय असेल ते पतीला व दीराला जेवायला द्यायचे व मग ती खायची. नाहीं तर आजच्या बायकांना असे करणे म्हणजे दबाव आल्यासारखे वाटते. स्त्री ही पृथ्वीतत्त्वासारखी आहे; तिच्यात इतकी शक्ति आहे की सर्व प्रकारची दडपणे ती पेलू शकते; सर्व काही सामावून घेऊ शकते आणि सगळ्यांना प्रेम वाटते. ही शक्ति परमात्म्यानेच दिलेली आहे. आता हा पंखा फिरतो आहे पण त्याला ही शक्ति ज्या ठिकाणाहून आली ते मोठं का हा पंखा मोठा? स्त्री-शक्तिस्वरूप हा महाशक्तीचा एक सागर आहे; आणि त्यातूनच पुरूषही आपले कार्य करत असतो. म्हणजे स्त्री ही Potential शक्ति तर पुरूष ही Kinetic शक्ति. पण पुरूष भागदौड करतो म्हणून स्त्रीला भागदौड करावेसें वाटणे हे चुकीचे आहे. ती बसूनच कार्य करणार. दोघांचे कार्य व क्रिया वेगवेगळ्या आहेत. दोघांनाही आपापल्या क्रियांमधे समाधानी रहायला पाहिजे. तशी वेळ ठेपली तर स्त्री पुरुषापेक्षाही जास्त कार्य करू शकते. महाराष्ट्रात ताराबाई नावाची १७ वर्षीय विधवा झालेली स्त्री शिवाजी महाराजांची सून होती आणि त्या परिस्थितीत इतर सरदारांना जमले नाही ते औरंगजेबाला जेरीस आणण्याचे काम तिने केले. स्त्री अशा तऱ्हेने प्रचंड शक्ति सामावून घेणारी असते. म्हणून तिने ही शक्ति फालतू, हलक्या-सलक्या कामामध्ये दवडली तर ती शक्ति नष्ट होते. स्त्री

ही पुरुषापेक्षा कितीतरी पटीने अधिक कार्य करू शकते. म्हणून तिने आपल्यामधील या शक्तीचा मान राखला पाहिजे आणि ही शक्ति न दवडण्याबद्दल तिने सतर्क राहिले पाहिजे. स्त्रीचे कार्य महत्त्वपूर्ण व गौरवपूर्ण आहे आणि म्हणून ती लज्जाशील व सूझ-बूझ असणारी हवी. पुरुष वेडेवाकडे बोलतात, बोलू दे, एकमेकांना वाचवणे हे तिचे काम. ढाल जशी तलवारीचे काम करू शकणार नाही, तलवार जसे ढालीचे काम करू शकणार नाही. मग ढालीचे महत्त्व जास्त का तलवारीचे? ढाल तलवारीचे घाव पचवू शकते म्हणून तिला महत्त्व. तसे स्त्रीने ढालीसारखे असावे. अशा शक्तिशाली स्त्रीचा पहिला गुण म्हणजे नम्रता. नम्रतापुर्वक आपली शक्ति आपल्यामधे सांभाळून ठेवली पाहिजे. सहजयोगिनींना हे कठीण नाही. खूप बडबड करणाऱ्या सहजयोगिनी मी पाहाते, त्यांना खरे तर पुरूषांबरोबर जास्त बोलायची गरज नाही, उलट स्त्रियांनी पुरूषांसारखे सहजयोगाचे सर्व ज्ञान मिळवले पाहिजे, सर्व चक्रांची सविस्तर माहिती असावी. या बाबतीत त्यांनी पुरूषांच्या मागे पडता कामा नये.

आता पुरूषांबद्दल बोलायचं म्हणजे श्रीरामचंद्रांचा आदर्श आपल्यासमोर ठेवायला हवा. या बाबतीत मुसलमान लोकांमध्ये एक दोष मला दिसतो जो त्यांच्या देशात आढळत नाही. त्यांच्याकडे रस्त्याने जाणाऱ्या स्त्रीला फार जपतात पण आपल्याकडे स्त्रीकडे फक्त उपभोगवस्तू म्हणून बघतात; जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक स्त्रीकडे मान मोडेल इतके वळून-वळून बघणार, प्रत्येक स्त्रीकडे नजर लावणे हे मोठं पाप आहे; सहजयोगात तर ते निषिद्ध मानले आहे. त्याने सहजयोगामध्ये नुकसानच होईल हे नक्की; नाही तर अंधत्व येईल. यामुळे जे मोठे नुकसान होते ते म्हणजे तुमचे चित्त खराब होते; ते अस्थिर होते. चित्त जर भरकटायला लागले तर आत्मसाक्षात्काराचा काय फायदा? चित्त एकाग्र झाल्याशिवाय ते कार्यान्वित होणार नाही. एकाग्र चित्तच कार्य करु शकते. पाश्चात्य देशामधे हीच मोठी अडचण आहे. पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही मी नेहमी सांगत असते की जमिनीकडे पाहत चला, जमिनीपासून तीन फुटांपेक्षा वर दृष्टि टाकू नका. कारण लहान मुले, फुले, फुलझाडे हेच तीन फुटापर्यंत नजरेत येत असते. त्याहून वर बघण्यासारखं काय आहे? अशा तऱ्हेने आपले चित्त प्रत्येकाने नियंत्रणात आणले पाहिजे. श्रीराम तुमचे आदर्श आहेत तर त्यांच्यासारखे चित्त कंट्रोल करायला पाहिजे. आपल्या पत्नीलाही समजावून सांगा की ती शक्ति आहे व तुम्ही तिचा आदर करता. पण तीसुद्धा त्यासाठी योग्य हवी. म्हणून म्हटले आहे की "यत्र नार्याः पुण्यन्ते, रमन्ते तत्र देवताः ।" दुष्ट स्वभावाच्या राक्षसी वृत्तीच्या स्त्रीची कुणी पूजा करेल का? म्हणून स्त्रीनेसुद्धा स्वतःला पूज्यनीय ठेवले पाहिजे. तसेच स्त्री ही आपल्या मुलांची आई आहे हेहि ध्यानात घ्या. मुलांसमोर पत्नीला तुम्ही रागावत राहिलात तर तिचा मान कसा राहणार? मुलंही मग तिला मानणार नाहीत. तिचे ऐकणार नाहीत. त्याचप्रमाणे पत्नीनेही पतीचा कधीही अपमान होईल असे वागू नये. पती-पत्नी दोघांनाही या गोष्टींचे भान नसले, पत्नी म्हणू लागली की माझेच खरे वा पति म्हणू लागला मी म्हणतो तसेच झाले पाहिजे तर झगडेच होणार. पुरुषाला आपल्या मनासारखे पत्नीला वळवता आले तर भांडणे होणारच नाहीत. पुरुषाला तसे मनवणे खूप सोपं आहे. कारण मुळात ते मुलांसारखे भोळे असतात. बाहेर ऑफीसमध्ये पुरुष परेशान झाले की घरी येऊन बायकोवर तो राग काढतात. म्हणून बेकार गोष्टींवर त्यांना परेशान करू नये; मुलांना करतो तसे त्यांना माफ करत जावे. पत्नीमधे जोपर्यंत हा भाव रुजणार नाही तोपर्यंत दोघांमध्ये सामंजस्य येऊ शकत नाही. तसेच पतीनेही आपल्या पत्नीला काय आवडते, काय हवे, काय नको इकडे लक्ष द्यायला हवे. पत्नीचे खरोखरच जर काही चुकत असेल तर तिला जरूर रागवा किंवा स्पष्ट नाही म्हणा. पण बारीकसारीक क्षुल्लक गोष्टींवरून झगडा करण्याची मुळीच जरूरी नाही. विशेषतः सहजयोग्यांनी लहान-लहान गोष्टींवर वाद घालणे अगदी अयोग्य आहे व ते टाळले पाहिजे. मला तर सहजयोगी एकमेकांच्या भांडणाबद्दल सांगतात तेव्हा फार आश्चर्य वाटते. सहजयोगी एकमेकांबरोबर प्रेमाने राहू शकत नसले तर साऱ्या संसारात (जगात) ते कसे आनंदाने राहू शकणार? म्हणून प्रत्येक पतीने आपल्या पत्नीबद्दल जागरूक असायला पाहिजे आणि इतर सर्व स्त्रियांकडे आई/बहीण म्हणून पाहिले पाहिजे. हे जर सहजयोगात येऊनही जमले नाही तर कधीच शक्य होणार नाही. मी जे हे कार्य करत आहे ते श्रीराम, श्रीकृष्ण, ईसामसी कुणी करू शकले नसते. जर श्रीराम असते तर त्यांनी शिरच्छेद केले असते, अधर्मी स्त्रीलंपट म्हणून त्यांना ठार केले असते; श्रीकृष्ण असते तर सुदर्शन चालवून त्यांना खतम केले असते. म्हणून हे कार्य एक माताच करू शकते; तिच्यामधे प्रेमाची एवढी शक्ति आहे की ती कसल्याही प्रसंगी कार्य करू शकते. आणि तिचे करणे इतके कोमल असते की मुलासारखे सहज. मुलांना मारले, रागावले तरी मुले जाणतात की आई आपल्या हितासाठीच हे करते. मातेचे प्रेम निर्व्याज असते. माझी मुले ठीक व्हावी. माझी शक्ति त्यांना मिळावी हाच तिचा ध्यास असतो. पण काही बायका अशा असतात की सारख्या पुढे-पुढे असा आक्रमकपणा दाखवतात. पति गप्प पण ही आगाव. अशा परिस्थितीत मुले बिघडतात; वाईट कामांकडे वळतात. हे सर्व हानिकारक असते. स्त्री ही Potential आहे. तिने मागे राहूनच कार्य करायचे आहे. तुम्ही म्हणाल की माताजी सारं बायकांनाच सांगतात. पण याचे कारण म्हणजे तुम्ही किती शक्तिशाली आहात हे मीच जाणते. आता तुम्ही माझ्यावर सर्व काही सोपवले आहे; लोकांना पार करा, त्यांची चक्रे ठीक करा, त्यांचे आजार बरे करा, दिवसभर हेच करा. श्रीरामांनी एका अहिल्येचा उद्धार केला; येशूने एकतीस लोकांचा उद्धार केला; मी तर ३१००

लोकांना ठीक केले असेल. जगभर हिंडत रहा, सर्व लोकांवर कार्य करा हे सोपे आहे का? पण ही शक्ति प्रेमाची असल्यामुळे मला तेच करण्यात आनंद होतो. जिथे जाते तिथे लोक पायावर येतात. नुसते समोर आले तरी त्यांचे सर्व प्रश्न माझ्यात येतात आणि या प्रेमातूनच सर्व घटित होते. आणि म्हणूनच मला त्याचे काही वाटत नाही; थोडा त्रास झाला तरी हरकत नाही. हीच माझी इच्छा आहे. पुरुषांनीसुद्धा स्त्रियांना पूर्ण मनापासुन मदत केली पाहिजे, त्यांना समजून घेऊन त्यांचा आदर ठेवला पाहिजे. पुरूष आणि स्त्री एकाच रथाची चाके बनली नाहीत तर रथ पुढे कसा चालणार? जसे रथाच्या डाव्या बाजूचे चाक उजवीकडे लावले किंवा उजवीकडचे डावीकडे लावले तर चालत नाही. म्हणजे ही दोन चाके एकसारखी आहेत पण आपापल्या जागी असल्यामुळे एकमेकापासून भिन्न आहेत. आकाराने जसे ते वेगळे असतात तसे त्यांचे कार्यही वेगवेगळे आहे. श्री रामचंद्रांनी फक्त पति-पत्नीचाच विचार न करता आपल्या मुलांचा, कुटुंबाचा विचार केला, बहीण-भाऊ, आई-वडील यांचाही विचार केला. मनुष्याने हेच करायला पाहिजे. तसेच त्यांनी प्रजा, समाज, देश, राज्य इ. साऱ्यांचा विचार केला आणि मनुष्याचे कर्तव्य काय हे दाखवून दिले. आपली पत्नी सीता पूर्ण शुद्ध असल्याचे माहीत असूनही तिचा त्याग केला. नाही तर आजकालचे पुरुष पत्नीला हे पाहिजे, ते पाहिजे, हे द्या. ते द्या. इ. इ. प्रकारात गुरफटलेले असतात. श्रीरामांनी साक्षात देवी-स्वरूप शुद्ध असलेल्या पत्नीचा त्याग केला. म्हणून आपल्याला हे माझे, हे घर माझे, नातलग-मंडळी इ. बद्दल जे ममत्व असते त्याचा विचार करायला हवा. आपल्यामधले चार-पाच लीडर्स त्यांच्या बायकांच्यामुळे काढले गेले. म्हणून स्त्रीने सहजयोग जास्त समजून घेतला पाहिजे आणि नवऱ्यालाही पत्नीबरोबर थोडेसे जमवून घ्यायला हवे; तिला खूप बोलू नकोस, धावपळ करून नकोस, तुझे चक्र ठीक नाही असे एकसारखे म्हणू नये. सहजयोगात आल्यावरही कधी कधी आपल्या प्रवृत्ति आपल्याबरोबर चिकटून येतात म्हणून अशा बाबतीत काळजी घ्यायला हवी.

आता आपल्याला श्री हनुमानाचा, ते श्रीरामाची कशी सेवा करत होते याचा विचार करायचा आहे. त्यांची कार्यपद्धती सहजयोगात आपण वापरायला पाहिजे. आता याचा हा अर्थ नाही की तुम्ही माझ्यासाठी स्वयंपाक करत रहा; मी तर काही खातच नाही ,उलट माझ्यासाठी एवढे पदार्थ बनवता त्याचाच मला त्रास असतो. जो देव खातच नाही त्याला सारखा जेवणाचा त्रास कशाला द्यायचा? मला तुमची तत्परता पाहिजे. हनुमान काही रामासाठी जेवण बनवत नसत. जे करायला पाहिजे ते तुम्ही करा. तसेच माझ्यासाठी नेहमी तऱ्हेतऱ्हेच्या भेटवस्तू तुम्ही देता त्याचाही मला कंटाळा आला आहे. नुसती फुले आणलीत तरी पुरे, तीसुद्धा फार जास्त नको. नाही तर कधी कधी फुलांचा व हारांचा ढीग पाहूनच मला भिती वाटते. म्हणण्याचा अर्थ हा की जे काय करायचे ते संतुलनामध्ये तुम्ही केले पाहिजे. म्हणून हनुमानाची सेवा पाहून तुम्ही शिकले पाहिजे. मी धडधाकट असल्यामुळे माझी काही खास सेवा करायची पण जरूर नाही. माझी सेवा करायची असेल तर सहजयोगाची सेवा करा. तुम्ही किती लोकांना साक्षात्कार दिला, जागृत केले हे पहा. नवीन लोकात तुम्ही किती आस्था घेता? प्रोग्रॅमला कोणी नवीन आले तर याला ही पकड आहे, याच्यात भूत आहे वगैरे मुर्खपणाची बडबड करू नका. सहजयोगात आल्यावर सोडून दिलेल्या एका व्यक्तीला मी कारण विचारले तर म्हणाला माझ्यामधे तीन भुते आहेत असे मला सांगितले; मी म्हटले की तुम्ही विश्वास कसा ठेवला तर म्हणाले की ते कुणी महारथी सहजयोगी होते आणि ओरडून ओरडून तसे सर्वांना सांगत होते! हनुमान म्हणायचे रामाचे कार्य करणे हेच माझे कार्य. आपले कार्य काय आहे तर सहजयोग करणे, इतरांची कुंडलिनी जागृत करणे, दुसऱ्यांना ठीक करणे, सर्वांना शांति मिळवून देणे व सर्वांशी प्रेमाने वागणे. त्यांना सहजयोगाची माहिती समजावून सांगणे– पण नुसती लेक्चरबाजी नको. अशा काही लोकांना मला सांगावे लागले की आता लेक्चबाजी बंद केली नाहीत तर सहजयोगच बंद पडेल. जरा चान्स मिळाला की तास-तास लेक्चर देत सुटतात; माईक हातात आला की सोडायलाच तयार नाहीत. ही आता एक बीमारीच झाली आहे. खरं म्हणजे माझ्या प्रोग्रामची व्हिडिओ कॅसेट दाखवा किंवा ऑडिओ कॅसेट लावा एवढेच पुरे आहे. नवीन लोकांना ठीक करण्यासाठी एका ठिकाणाहून दुसरीकडे भागदौड करण्याचीही जरूर नाही. खरं म्हणजे तुम्ही प्रत्येक जण महिलासुद्धा, दुसऱ्यांना ठीक करू शकता पण कुणी पुढेच येत नाहीत. इकडे म्हणे एकच माणूस भारतात सगळीकडे जात राहतो; लंडनमधे असे १५-२० लोक काम करत असतात. त्यात काय अवघड आहे? बंधन घ्या, दुसऱ्यांना ठीक करा; बाहेरून माणूस बोलवायची गरज नाही. तुम्ही स्वतःला ठीक करत नसाल तर दुसऱ्याला कसे ठीक करणार? तुम्हा सगळ्यांजवळ ती शक्ति आहे. तिचा उपयोग करा. वृक्ष पसरत असतानाच खाली खोलवर जात असतो. तसेच तुमचे आहे; जितके कार्य कराल तितके गहनतेत याल. पूर्वीच्या काळी संतांजवळ ही शक्ति नव्हती, एकाद-दुसऱ्याला ते देऊ शकले. पण आता तुम्हा सर्वांजवळ ती शक्ति आहे मग तुम्हाला काय कमी पडणार आहे? पण तुमचे चित्त अजूनही भरकटत आहे, कशाकशाला तुम्ही अजून चिकटून आहात. तुमचे कार्य समाजात परिवर्तन घडवून आणणे हे आहे. म्हणून श्रीरामांच्या माध्यमातून कार्य करा. यातून आपण आदर्श मानव कसा असतो हे शिकायचे आहे; धर्मानुरुप कसे रहायचे हे शिकायचे आहे. कितीही संकटे आली, समस्या उत्पन्न झाल्या तरी धर्म सोडू नका आणि सहजयोग खंबीरपणे पसरवा.

तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद.

०००

# शक्ति - पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

दिल्ली : ३.१२.९३

आज आपण शक्तियुगांत शक्तीची पूजा करणार आहोत. शक्तियुगाची सुरुवात झाली असल्यामुळे शक्तिदेवीचे रूप प्रखर झाले आहे. शक्तीचे पहिले रूप आहे प्रकाश; तेजस्वी, तेजःपुंज शक्ती. ही शक्ती जेव्हा सत्ययुगांत प्रगट होईल तेव्हा सर्व अनीतिमान लोक उघडे पडणार आहेत; त्यांची सारी कारस्थाने उघडकीस येतील, आजपर्यंत त्यांच्या ज्या गुप्त कारस्थानांत ते गुंतले होते ते पण सर्व जाहीर होतील. मनोवृत्तीहीन वा हिंसक अशा दुष्टप्रवृत्ती- ज्या सत्याला मान्य नाहीत- पसरवणाऱ्या सर्व संस्था किंवा व्यवस्था यातून वाटणार नाही. कारण सत्याच्या प्रकाशामध्ये हे सर्व उघडकीस येणार आहे; त्या प्रकाशामध्ये शक्तीचे एक विशेष स्वरूप तुमच्या नजरेस येणार आहे, तिची एक खास आकृती दृष्टीस पडणार आहे. कारण मी पूर्वीच सांगितले आहे की, आता कृतयुग सुरू होणार आहे व नंतर सत्ययुगाचा प्रारंभ होईल; सत्ययुगाचा सूर्य क्षितीजावर आलाच आहे. याची प्रचितीही तुम्हाला येईल. परिणामी सत्याच्या समोर जे असत्य आहे ते लपून राहणार नाही; मग तो सहजयोगी असला तरी त्याची धडगत नाही; सहजयोगी म्हणूनही चुकीच्या मार्गाकडे चालत असलेल्यांचा निभाव लागणार नाही; आजपर्यंत सत्याने त्यांना आधार दिला, संभाळ केला पण आता ती स्थिति संपली; सत्याकडे तशी शक्ति नाही. मी कालच सांगितले होते की सत्याची सर्वांत मोठी शक्ती म्हणजे प्रेमशक्ती. प्रेमाचा खोलवरचा अर्थ हाच असतो की निरपेक्ष, निःस्वार्थ भावनेने सगळीकडे प्रेमाचे साम्राज्य पसरवायचे; आणि ती शक्तीच मग कार्य करू लागेल. पण परमचैतन्याच्या या कार्यसिद्धीसाठी तुम्हालाच त्याचे माध्यम बनायचे आहे; ते जर स्वतःच कार्य करू शकले असते तर आज तुम्ही सहजयोगी होण्याची जरूरच नसती; सहजयोगाचीही जरूर नसती. पण आज जी सहजयोगाची आवश्यकता तुम्हाला समजली आहे ती म्हणजे सामूहिकतेमध्ये सहजयोगी आता तयार होत आहेत. तुम्हीच चैतन्याचे वाहक आहात. म्हणून तुम्ही कुठल्याही चुकीच्या मार्गाकडे ढुंकूनही बघणार नाही. याची तुम्ही काळजी घेतली पाहिजे. कारण ती शक्ती तुमच्यामध्ये प्रवाही झाली आहे सर्व शक्त्या तुमच्यामधून कार्यान्वित होत आहेत आणि ती शक्तीच तुम्हाला बलशाली, समृद्ध व स्वास्थ्यशाली बनवणार आहे. दुसरी कुठलीही तुम्हाला जरूर नाही; आणि तसे जरा जरी केलेत तरी तुम्ही खाली याल. उदा. स्वतःला फार मोठे समजणारे लोक मला निरोप पाठवतात की आम्हाला काही खास कामासाठी तुम्हाला भेटायचे आहे. तसं कोणी स्पेशल नसतातच. मग इतर लोक म्हणू लागतात की नाही भेट दिली तर उगाच त्रास देतील त्यापेक्षा भेट दिलेल बरे. मग मोठ्या समारंभासारखे ते माझ्यापुढे येतात. पार होतात. ठीक पण होतात. पण त्यानंतर ते पुन्हा नाव घेणार नाहीत. कारण त्यांना सत्याची शक्ती किती महान आहे हे समजतच नाही. एकदा जर सहजयोग घेतला तर सहजमध्येच उतरणे योग्य आहे. नाही तर तुमचे काही सांगता येणार नाही. सहजमध्ये आल्यावरही माझा काय फायदा होणार, माझा मुलागा-मुलगीपासून पैसा-धंदा-इनकम टॅक्स इ. इ. पण हे सर्व प्रश्न एकामागोमाग सुटणारे असतात. खरं तर सहजमध्ये आल्यावर माणसाला जर समाधान नसेल तर त्याच्यासाठी सहजयोग बेकारच म्हणायचा आणि समाधान एकदा मिळाले की मग मागायचे काही राहतच नाही. काहीही चुकीचे काम करण्याची जरूर नाही. घरातल्या लोकांना, नातेवाईकांना, समाजाला हानिकारक असे कुठलेही कार्य सहजमध्ये आल्यावर सिद्धीस जाणार नाही, त्याचे परिणाम भोगावेच लागणार. सहजयोगांत आलेले पण पैसा-भांडणं-झगडे करणारे बरेच लोक मी पाहिले पण ते सारे दूर गेले. कारण सहजची शक्तीच त्यांना धुडकावून लावते. आता ठीक होऊन परत आले तर गोष्ट वेगळी. जसे समुद्राला भरती आणि ओहोटी आणणाऱ्या दोन शक्ती असतात त्याचप्रमाणे सहजच्या शक्तीचे स्पंदन चाललेले असते. म्हणून एकदा आकुंचन व मग पूर्णपणे उठणे चालूच राहते. आदिशंकराचार्यांनी व्हायब्रेशन्सला 'स्पंद' हा शब्द दिला आहे. म्हणजे एकदा आपण वर येता पण लगेच आपण खाली फेकले जाऊ शकता मी तुम्हाला घाबरवीत नाही तर सूचना देत आहे की, आपली वागणूक अशी झाली पाहिजे की, आपण सहजमध्ये पुढे-पुढे प्रगती प्राप्त करून घेऊ. मी नुकतेच म्हटले होते की उत्तर-भारतात सहजयोग खूप जोरांत पसरत आहे, हजारो नवीन

लोकांची रीघ लागली आहे कारण सहजयोगांत अनेक प्रकारचे फायदे आहेत. आरोग्य मिळते, पैशाचे प्रश्न सुटतात, संतान प्राप्ती होते इ. अनेक प्रकारचे फायदे कमी-जास्त प्रमाणात सर्वांना मिळाले आहेत. पण सहजयोगातून होणारा सर्वात मोठा लाभ म्हणजे समाधान; मग काही सांगणेच शिल्लक रहात नाही. ही स्थिती आली का मगच आपण सहजयोगांत स्थिरावलो असे समजा. त्यानंतर तुमच्या नकळत सहजच तुमचे पालन-पोषण करणार, तुमची देखभाल करणार. आपल्याला पूर्णपणे संतुष्टता मिळते आणि ऊच्च प्रकारचे समाधान मिळते. लोकांना तर वाटेल की तुम्ही निरीच्छ झालात असे वाटेल, संन्यासी झालात असे म्हणतील पण तुम्हाला त्याचे काही वाटणार नाही. एकदां मी अमेरिकेत एका दुकानात गेले आणि त्याच्या मालकिणीला जागृती दिली नंतर ती म्हणाली, "माताजी, कमाल झाली. आधी मी दुकानांत काय आले, काय विकले गेले याची इत्थंभूत माहिती ठेवायची, तरी नेहमी तोटाच. पण आता मला कशाचीच काळजी वाटत नाही आपण तरीही मला नफाच नफा होत आहे. मला कळतच नाही." म्हणजे सहजनेच तिला दत्तक घतले आणि कुणीतरी जणू दुकान चालवत आहे आणि ती आरामात मस्त आहे. अशी तिची स्थिति झाली.

असे झाले की मनुष्य समजतो की तो समाधानाच्या खूप वरच्या थराला आला आहे. त्याला कसलाही विचार करण्याची जरूर रहात नाही. कारण तो विचारांच्या पलीकडे गेलेला असतो. सहजांत येण्याआधी तो प्रत्येक बाबतीत विचार करतो प्रत्येक गोष्ट तोलून-मापून तपासतो, सारखा धड्याळ बघतो. आणि इतके करूनही काही ना काहीतरी बिघडते व डोकेदुखी होते. पण सहजचे कार्यच अर्थाप्रमाणे सहज आहे, प्रत्येक गोष्ट एकदमच सहजपणे घडते. हे अनुभव तुम्हा सर्वांना आले असतील किंवा येतील म्हणून सहजावर सर्व सोपवणे ही शक्ती या सत्ययुगांत कार्य करणार आहे तुम्ही सहजावर पूर्णपणे निर्भर झालात की तुमचे सारे जीवनच सुगंधित, सुंदर होऊन जाते आणि तुम्हाला कसलीही काळजी करण्याची जरूर पडत नाही एकदां आमच्याकडे चोरी झाली. सर्व कपडेलत्ते गेले आणि सिल्कची एकुलती एकच साडी शिल्लक राहिली; तीच साडी मी बाहेर पार्टीला वगैरे जाताना वापरायची. माझ्या पतीला पण त्याचे नवल वाटू लागले. आता तर मी नको नको म्हणत असते तरी तुम्ही साड्या देतच राहता; त्या ठेवायच्या कुठे हाच मला प्रश्न पडतो. म्हणून समाधान मिळणे ही फार फार मोठी गोष्ट आहे. आता लोकांना एक गोष्ट धडपड करून मिळवली किंवा कर्ज काढूनही महागडी वस्तू मिळवली तरी थोड्याच दिवसांनी आणखी दुसऱ्या वस्तूची हाव सुटते. आजकाल दिल्लीमध्ये सगळीकडे सुंदर-सुंदर फुले दिसत आहेत पण आपल्यापैकी कीती जणांची दृष्टी तिकडे गेली असेल माहीत नाही.

तुमचे लक्ष जर तुमच्या आत्म्याकडे असेल तर आत्मा तुम्हाला तेच दाखवेल जे तुमच्यासाठी सुखाचे, आनंददायक असेल त्यामधूनच तुम्हाला स्वार्थ म्हणजे 'स्व'चा अर्थ समजेल. आपल्या पूर्वजांनी 'स्वार्थ' सारखे अनेक अर्थपूर्ण शब्द शोधून काढले आहेत. लोकांना वाटते स्वार्थ म्हणजे स्वतःसाठी पैसा-सत्ता कमवायचा मार्ग, पण त्यांतून समाधान मिळणार नाही. म्हणजे 'स्वार्थ' हा शब्द 'शोध, शोधून काढ' असा आहे. सहजधारेत आल्यावर तुम्हाला समजले पाहिजे की या सत्ययुगांत तुम्हाला सांभाळणारा जो कोणी आहे त्याला कोट्यावधी हात आहेत. त्याने तुम्हाला पदरांत घेतले आहे. मग चुकीच्या मार्गाने कशाला जायचे? कशाला फालतू गोष्टींच्या मागे धावायचे? त्यामुळे तुम्हालाच पक्कड येऊन त्रास होणार आहे. शिवाय कसल्या अयोग्य गोष्टींमध्ये अडकलात तरीही चुटकीसारखे सुटाल. उदा. आम्ही एकदां कॅनडामधून चार-पांच मातीच्या मूर्ति आणल्या, इकडे येतो त कस्टमअधिकाऱ्यांनी त्याची किंमत १८००० लावली? १८ रू. जेमतेम किंमतीचे १८००० रु! पोलीसही आले; तेही माझ्यासारखे हसू लागले. पण शेवटी सोडून दिले. म्हणजे दुसऱ्याची चूक होती म्हणून प्रश्न आपोआप सुटला. सहज आपोआप असे सर्व घडवून आणतो. जे जरूरीचे व आवश्यक आहे ते कार्य सहजमध्ये होणारच होणार. म्हणून सहजवर सर्व काही सोपवायला शिका. पुष्कळ वेळा आपण पाहतो की लोक उगीचच काळजी करत बसतात.

सत्ययुगात शक्तीचे जे रूप आहे ते प्रकाश, सत्य प्रेम व मनःशान्ति असे आहे. तुम्ही मनःशान्ति मिळवली पाहिजे जे काही घडत आहे ते नुसते पहात रहा. जर कुणी विचलित होत असेल तर तो सहजी नाही. सॉक्रेटिस हजरत निजामुद्दीन ही नावे तुम्ही ऐकली असतीलच. हजरतला तर आज्ञा मिळाली होती की, "उद्या माझ्यासमोर येऊन मान वाकवून मुजरा केला नाहीस तर तुझा शिरच्छेद होईल" पण त्या रात्री शहेनशाहाचाच वध झाला. समुद्रात जशी भरती येते आणि ओहोटी होते तसे सहजमध्येही दोन शक्ती तुमच्यावर देखरेख करत असतात. पहिली शक्ती प्रगती (बढावा) करते तर दुसर शक्ती तुम्हाला दूर फेकते. एकदां जो सहजयोगांतून बाहेर गेला की त्याचा माझा संबंध संपला; माझ्यावर त्याचा काही अधिकार नाही. माझ्यावर जर काही अधिकार हवा असेल तर प्रथम सहजयोगांत न्हाऊन घ्या. जसे सोन्याला तापवून त्याचे कुंदन केले (कोंदण) की त्याच्यात हिरा

घट्ट पकडण्याची शक्ती येते. कोंदणांत हिरा नुसता ठेवल्यासारखा बसवलेला असतो पण ते नाजूक कोंदण हिऱ्याला पकडून ठेवते. तुम्हीही असे कोंदण बनू शकता. मग तुम्हाला समाधानाची शक्ती प्राप्त होते. समाधानात विचार मावळलेले असतात. सहजयोगांत तुम्ही भावना, बुद्धी यांच्या पलीकडे (गुणातीत) अवस्थेत येता जिथे विचारांना थारा नसतो. काहीही नजरेस आले तरी त्याच्यावर विचार मनात येतच नाहीत. आपला अहंकार आणि संस्कार यांच्यामुळे आपल्या मनात विचार येत असतात. तसेच अति वाचन, कुणीतरी गुरू मानणे, चर्चा करत राहणे इ.मुळे येतात. रामदास स्वामी म्हणतात, "मिटे वाद संवाद ऐसा करावा" आपण सहजमध्ये आपल्यावरही प्रत्येक बाबतीत विचार करत राहतो. खरं तर असे म्हणायचे की सहजला आपण पूर्ण वाहून त्याच्यावरच भरवसा टेऊन आहोत तर विचारही सहजच करणार; आपल्या सभोवार जे काही प्रश्न आहेत त्यांतून सहजच मार्ग काढणार. आता आज मी तीन वाजता पूजा करूं असे म्हटले; मनात आले की घरातले सर्व उरकून तीन वाजता लोक कसे येऊ शकणार? उशीरच होईल, तरी ठीक, होऊ दे. काही बिघडत नाही असेही वाटले. पुष्कळ वेळा माणसाचा रस्ता चुकतो. पत्ता हरवतो आणि मग काय करू, कुणाला विचारू असे त्याचे मनात येऊन चलबिचल होऊ लागते. अशा वेळी समजायचे की रस्ता चुकला तोही सहजमुळेच; कदाचित याच चुकलेल्या रस्त्यावर कुणी तरी भेटणार असेल, काहीतरी न पाहिलेले मिळणार असेल किंवा काही नवीन अनुभव मिळणार असेल आणि त्यासाठीच आपण रस्ता चुकलो आहोत मग चिंता कशाला? शिवाय अशा वेळी आपण काही युद्ध करायला निघालेलो नसतो! आणि युद्धाची जरी वेळ आली तरी सहजयोगी स्वतः युद्ध न करताही जिंकणारच आहेत.

सत्ययुगांत विचारशून्यता मिळाल्यावर माणसाला समजते की विचार शक्तीहीन असतात. ज्या ज्या देशांत आणि काळात लोक विचारांवर अवलंबून राहिले त्यांचे नुकसानच झाले. अमेरिकेतही लोक उठसूठ कुणालाही भगवान समजू लागले मग तो महामूर्ख का असेना आणि प्रत्येक वेळा आनंद मिळवणे हाच विचार करू लागले. पण आनंद ही वस्तूच अशी बनवली गेली की त्यापासून आनंद नष्टच होणार असतो. त्यांच्याजवळ अशी कोणतीच गोष्ट नाही की तिच्यामध्ये ही नष्ट होण्याची भावना नाही आणि जोपर्यंत तसे होत नाही, तोपर्यंत त्यांना आनंदाची परिसीमा झाली आहे हे त्यांच्या लक्षांत येत नाही. उदा. बर्फाच्या डोंगरावरून घसरण्याची शर्यत जिच्यामध्ये पाय तुटेपर्यंत धावत राहणार आणि तरीही खेळ चालूच राहणार. आमच्या मुली जिथे रहायच्या तिथे एक चर्च हते आणि शेजारीच एक पब होता. पबमध्ये येणारे लोक आतून तर्र होऊन धडपडत बाहेर येणारे लोक पहायचे पण तरीही आत जाण्यासाठ रांगा करून उभे रहात. या सर्वांचा अर्थ हाच की विचार करण्यामुळे बुद्धीचे नुकसान होते. बुद्धीमधून माणसाने जे जे काम केले ते अहंकारातून झाल्यामुळे चुकीचे ठरले. त्याचेच परिणाम आपण आजही भोगत आहोत. पण आत्म्याच्या प्रकाशांत जे कार्य होते ते नेहमी सुचारू-रूप असते; त्यांत समजूतदारपणा असतो आणि विचारामध्ये चेतना नसल्यामुळे त्याच्यात असा समजूतदारपणा, सूझ-बूझ नसते.

आज आता सत्ययुगाची सुरूवात झालेली असल्यामुळे मागे वळून पाहण्याची जरूरी नाही. कारण आता तुमच्याजवळ प्रकाशाची महान शक्ती आहे. आणि असा विलक्षण प्रकाश की ज्याच्यामध्ये तुमची छायासुद्धा पडत नाही. पुढे प्रकाश, दोन्ही बाजूंना प्रकाश व मागेही प्रकाश. पण हा प्रकाश, त्याची ज्योत तुम्हालाच प्रज्वलीत करायची आहे. त्यासाठी छोटासा उपाय मी सांगत असते आणि तो म्हणजे ध्यान करा. तेही नाही जमले– विशेषतः महिलांना जमत नाही. कारण त्या सारा वेळ स्वयंपाक घर, मुले-बाळे यांत दंग असतात; त्यांनीच खरं तर जास्त ध्यान केले पाहिजे कारण स्त्री ही समाजाची शक्ती आहे, तीच समाज निर्माण करते. रशियांत म्हणे बायका गाडी, ट्रेन, विमानेही चालवतात;पुरुषांना नोकऱ्या नाहीत आणि बायकांना याची काय गरज? स्त्रियांचे कार्य म्हणजे चांगला समाज बनवणे, त्यासाठी समाधानी वृत्ती व समजूतदारपणा स्त्रियांजवळ असायला पाहिजे. त्याचबरोबर स्त्री नम्र असावी, नम्रता नसली तर ती स्त्री नाहीच. प्रत्येक बाबतीत पुरुषांची बरोबरी करणे स्त्रीला शोभत नाही; तुम्ही स्वतः शक्तीशाली असताना या गोष्टीत कशाला अडकता? म्हणून मी नेहमी सांगत असते की ज्या देशांतील स्त्रिया समाज-निर्मितीकडे दुर्लक्ष करत आल्या ते देश धुळीला मिळाले. आपल्या मुलांचे संगोपन, घर व्यवस्थित ठेवणे इ. सर्व कार्य म्हणजे एक मोठी जबाबदारी आहे. अर्थात जरूरच असली तर त्यांनी नोकरी करावी. एरवी जसे पुरुषांनी सुद्धा स्वयंपाक करायला शिकले पाहिजे असं मी म्हणते तरी ते त्यांचे मुख्य कार्य नाही. त्याप्रमाणे स्त्रीचे मुख्य कार्य हे आहे की तिने आपल्यामधील शक्ती प्रज्वलित केली पाहिजे. आपल्या देशातील स्त्रियांनीच समाज सावरला आहे हे लक्षात घ्या. पण ते काम जबरदस्तीने होत नसते तर प्रेम, निर्व्याज प्रेमशक्तीतून होणार आहे. पन्नादाई, पद्मिनी अशा स्त्रियांबद्दल मी परदेशांत सांगते तेव्हा त्यांना ते खरं वाटत नाही. त्या शक्तीशाली स्त्रियांमुळेच आपला समाज इतक्या कठिण परिस्थितीतही टिकून राहू शकला. त्यांचीच पुण्याई या सत्ययुगांत

विशेष रूप धारण करून आली आहे. आता काल रुमानियाच्या लोकांनी गाणी म्हटली; ज्यांना साधे सरगम माहीत नव्हते ते इतक्या थोड्या कालावधीत इतके शिकले ती शक्ती कुठून आली? हा सहजचाच चमत्कार आहे. असे अनेक चमत्कार तुमच्या जीवनांतही तुम्ही अनुभवले. तरीही तुम्ही विचारावरच निर्भर राहिलात तर कसे चालेल? म्हणून रामदासस्वामी म्हणतात "अल्प धारिष्ट पाहे" म्हणून सहजमध्ये विरघळणे ही एक मोठी मस्ती आहे. "जब मस्त हुअे तो क्या बोले?" अशा मस्तीमध्ये उतरा. याचा अर्थ असा नाही की वेडपटासारखे भटकत रहा, तर त्या मस्तीमधून तुम्ही कर्तव्यपरायण होता आणि त्यासाठी तुम्हाला शक्ती मिळणारच. ही शक्ती मिळवण्यासाठी तुम्ही प्रथम सहजशी पूर्ण समर्पित व्हा. पैसा, सत्ता आणखी असल्या सर्व भौतिक गोष्टी विसरा. "मला आता काही नको" असे जो म्हणेल तो खरा सहजोगी. असं झालं की ते परमचैतन्य आपणहून तुम्हाला काय पाहिजे याची काळजी करू लागते. ते देईल तेच तुम्हाला हवे असते; त्याचे असे चमत्कार पहाल की जे होण्यासारखे नव्हते तेसुद्धा घडून आलेले पाहून तुम्हीच आश्चर्यचकित व्हाल. संसारातले सारे प्रश्न, साऱ्या अडचणी दूर होतील आणि मागण्यासारखे असे तुमच्याजवळ काहीच उरणार नाही. तर उलट तुम्ही सारखे देत राहता समाधानाच्या सागरात जे पूर्ण डूबून गेले ते काय मागणार?

याचा अर्थ असा नाही की, आपण संन्यासी होता; जंगलात निघून जाता. या बाबतीरत राजा जनक हे याचे उत्तम उदाहरण आहे. ते विदेहि होते पण राज्य करत होते, दरबारी संगीत-नृत्य पहायचे, मिरवणूकीत यायचे, असे सर्व चालत होते तरीहि ते विदेही होते. एकदा नचिकेताने आपल्या गुरुला म्हटले.की, राजासमोर तुम्ही उभे का राहता तर ते म्हणाले "आम्ही संसार सोडून संन्यास घेऊन हे सर्व अनुभवले पण राजा जनकाने काहीही न सोडता ही स्थिति मिळवली." म्हणजे जे पकडले नाही ते काय व कसे सोडायचे अशी स्थिति येते. विचार आणि संस्कारातून ही जी पकड येते ती अहंकारामुळे जात नसेल तर तुम्ही अजून सहजांत उतरला नाहीत असे समजा. ही पकड(हाव) आपण प्रत्येक वस्तूला महत्व दिल्यामुळे येते. आत्मा कशालाच पकडत नाही. तो तर प्रकाशच चहूबाजुला पसरवणारा आहे. शक्ती देणारा आहे. अशी ही शक्ती अभिभूत असते, पूर्णपणे एकाकारिता देते. प्रेमापुढे सारे संघर्ष संपून जातात. अल्जीरित एक मुसलमान सहजयोगी होता. त्याचे आईवडील हजला निघाले तेव्हा त्याने त्यांना लंडनला जायला सांगितले. तिथे गेल्यावर तिथले सहजयोगी पाहून ते इतके प्रभावीत झाले की त्यांनाच आपला मुलाग इतका इतरांपेक्षा चांगला सुधारल्याचे त्यांच्यात परिवर्तन झाल्याचे त्यांना नवल वाटले. त्या मुलामुळे त्याच्या आईवडिलांमध्ये इतका परिणाम घडवून आणला तो सत्ययुगांतील या दुसऱ्या शक्तीने ती शक्ती सत्याची जे इतके प्रकाशमान, बलवान, प्रेममय आहे की त्याची छाप बऱ्याच लोकांवर पडते. महाराष्ट्रात सहजयोग पसरत असताना एक सहजयोगी होते. ते कलेक्टरच्या ऑफिसमध्ये काही कामानिमित्त गेले होते, तिथे खूप लोक कामासाठी आले होते व प्रत्येकाला आधी आत जायचे होते. या गृहस्थांनी सर्वांना आधी जाऊ दिले आणि स्वतः आरामात बसून राहिले. बऱ्याच वेळानंतर त्यांना आत जायला मिळाले. बराच वेळ थांबायला लावल्याबद्दल विचारल्यावर 'काही बिघडले नाही, मी आरामात ध्यान करत बसलो होतो' असं म्हणाले. त्यांना साहेबांनी विचारले की तुमचा गुरु कोण आहे? आग्रह करून करूनही त्यांनी नाव सांगितले नाही. परत घरी निघाले तर चार-पाच लोक त्यांच्या मागे. मग त्या लोकांनी पुन्हा-पुन्हा विचारल्यावर त्यांनी माझे नाव सांगितले. मग तेहि सहजयोगात आले. तसेच मी राहुरीला गेले होते तिथे तर फक्त एका माणसाच्या प्रभावामुळे अनेक लोक सहजयोगात आले होते. ते स्वतः अगदी साधारण व्यक्ति होते पण त्यांच्या चालण्या-बोलण्यात जो तेजस्वीपणा होता त्याचा प्रभाव पडला. म्हणून आज काल लोक असेच आहे, सगळेच बिघडले आहेत अशा सबबीत काही अर्थ नाही. "दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये" तसे तुम्ही झुकानेवाले व्यक्ति बना.

त्यासाठी तुम्ही सहजयोगी आता आत्मविश्वास ठेवा की तुम्ही सत्ययुगात आला आहात आणि सत्याची शक्ति तुमच्यामधून वहात आहे, कार्य करत आहे. तुम्हाला कशाची गरज भासणार नाही, सगळं काही आपोआप घडत राहणार आहे. तुम्हालाच कळणार नाही की हे कार्य कसे घटित होत आहे. काल मी दहा मिनिटी आधी इथेच जेवण जेवणार असे सांतिले कारण कवाल लोक बसले होते. पाच मिनिटांत पहाते तर चूल पेटवून लोक जेवण बनवण्याच्या तयारीत लागलेसुद्धा. लोकांना कळले नाही हे कसे जमले. यालाच स्पाँटेनियस (sponteneous) म्हणतात. या परमचैतन्य शक्तीचे वर्णन करणे अशक्य आहे. कुणी म्हणाले श्रीगणेशांनी दूध प्यायले का, श्रीशिवांनी दूध प्यायले का तर मी म्हणाल प्यायले असेल. मला तर मोठं नवल वाटते की माझ्याबरोबरही हे परमचैतन्य कमाल करत आहे. मला expose करत आहे तर ते काहीही करू शकेल. मला श्रीगणेश एवढे दूध पितात का हेहि माहीत नाही.

तुम्ही लक्षात घ्या की आता तुम्ही सत्ययुगात उतरले आहात आणि ही शक्ती हजार प्रकारे तुम्हाला प्रकाशित करणार आहे. श्री साई शिरडीबाबांचा सबूरी हा शब्द तुम्हाला माहीत आहेच. सबूरी ही स्थिति आहे. त्यांत सर्वकाही आले. या स्थितीला तुम्ही पोचलात की कुणाला काही सांगायची जरूर नाही.

काही बोलायची जरूर नाही; सर्व काही आपोआप घटित होणार असते. जे होईल असे तुमच्या मनातही वाटत नसेल तेही सर्व घटित होणार असते. आणखी एक विशिष्ट गोष्ट म्हणजे तुम्ही या भारतामध्ये जन्माला आला अनेक पूर्वजन्माच्या पुण्याईमुळेच तुम्हाला इथे जन्म मिळाला आहे. आणि इथेच सत्ययुगाची प्रथम सुरूवात होणारआहे आणि ते सऱ्या जगाला इथून समजणार आहे, त्याचा चमत्कार जगाला दिसणार आहे. तुम्हीच मशाल आहात आणि तुम्हीच ज्योत आहात. तुम्हालाच हा प्रकाश पसरवायचा आहे हे लक्षात घ्या, समजून घ्या व त्याचा स्वीकार करा. तुमच्यावर ही मोठी जबाबदारी आहे. मला लोक म्हणतात. माताजी तुम्ही अमेरिकेत जन्माला आला असता तर लोकांचे खूप कल्याण झाले असते. पण मी म्हटले की इथे जन्माला येणे हे मोठे भाग्य आहे. इथे सहजयोग खूप वाढत आहे. दूरदूर पसरत आहे. याचे मुख्य कारण हेच की तुम्ही या योगभूमीत जन्माला आला आहात. चारी बाजूंनी चैतन्य भरभरून वहात आहे. पृथ्वीमधूनही या देशांतच चैतन्य येत आहे. पण तुम्ही हे लक्षात घ्यायचे आहे की तुम्हीच या चैतन्याचे वाहक आहात. तुम्हालाच ते पसरवायचे आहे अजूनही मला दिसते की कुठे-कुठे काही ना काही कमतरता आहे, ती ठीक करा; ते ठीक करण्याच्या हात धुवून मागे लागा. शरीर-मन-बुद्धी-अहंकारादी सर्व उपाधी झाडून टाकायच्या आहेत असा दृष्टनिश्चय करा. तेव्हाच या देशाचा उद्धार होईल. तुमचा भविष्यकाल खूप उज्ज्वल आहे लोक उगीच या देशाला नावे ठेवत असतात. मी तर म्हणते उसळत्या अथांग सागरात मजबूत असलेले जहाजच टिकाव धरू शकते. तसे तुम्ही स्वतःला अजूनही मजबूत करा. एका बाजूला घोर अंधःकार असला तरी दुसऱ्या बाजूला तुम्ही तेजस्वी बनून महान प्रकाश आणू शकता. ही योग्यता येण्यासाठी तुम्हाला पूर्ण शक्तीने फक्त ध्यान करायचे आहे. प्रेमाने व भक्तीने ध्यान करा. त्यांतूनच तुम्ही इतके असाधारण व्यक्तिमत्व मिळवाल की तुमच्याकडे पाहूनच लोक प्रभावित होतील. हीच तुमची Potential शक्ती आहे. तुमच्यामध्ये उमलत असलेले गौरवशाली जीवन पूर्णपणे फुलू दे. फालतू भौतिक गोष्टींकडे ढुंकूनही पाहू नका. मला माझ्याच मोटारीचे नाव, रंग, किंमत माहीत नाही. पैसे मोजता येत नाही, चेक लिहीता येत नाही, इतकी मी निष्क्रिय आहे. पण ती जबाबदारी तुमचीच आहे. म्हणून आजच्या या शुभदिवशी सत्यमार्गानेच चालण्याची शपथ घ्या. तरच सत्य तुम्हाला मदत करणार. आपल्या चारित्र्यातून व सहजशक्तीतून आम्ही या देशाचा उद्धार करू असा निश्चय करा. एवढं सर्व काही जर तुम्ही आत्मसात केले आणि इतर सर्व फसव्या गोष्टी सोडून दिल्या तर चमत्कारच चमत्कार होणार आहेत. आता मी परदेशातून येताना तुम्हा सर्वांसाठी खूप भेटवस्तू आणल्या. पण कस्टमवाल्यांना बॅगा उघडूनही त्या दिसल्या नाहीत अशा जणू त्या अदृश्य झाल्या! कारण त्यांच्याभोवती प्रेमाचे आवरण होते. म्हणून त्यांना त्या दिसू शकल्या नाहीत. एका परदेशी महिलेने मला देण्यासाठी चांदीची थाळी आणली होती. परदेशांतून आणायला बंदी असते, पण कस्टमवाल्यांनी बॅग उघडल्यावर त्या थाळीवरचा माझा फोटो पाहून आदरपूर्वक नमस्कार केला. प्रेमाच्या देवाण-घेवाणीमधून असे प्रश्नही कसे सुटतात बघा. आपण सारे एक आहोत पण मनुष्याने आपली बुद्धी चालवून भेद निर्माण केले. धर्मामध्ये हेच झाले. माणूस माणसापासुन असा दुरावतो पण सहजयोगामध्ये एकमेकांमध्ये नुसते एकत्रीकरण वा समन्वय नाही तर शिवाय सामग्रीकरण आहे. हे सर्व घटित करणारी शक्ती आता कार्यान्वित झाली आहे; तिचा तुम्ही सर्वजण उपयोग करा कारण ती तुमच्यामधूनच प्रगट होणार आहे.

तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद.

०००

**सुधारणा करायला सांगितल्यास प्रतिक्रिया व्यक्त करू नये.**

"तुमच्याबद्दल कोणी काही म्हणाले व ते खरे नसेल तर त्याची काळजी करण्यासारखे काय आहे? परंतु लोक म्हणतात ते खरे असल्यास त्यासाठी काहीतरी करायलाच हवे."

मी तुमच्यावर रागावले. तुम्हाला बोलले, तुमचे लाड केले अमुक करू नका, असे सांगितले, फार निकट येऊ नका लांब रहा, असे सांगितले काही जरी केले तरी ते तुमच्या हिताचे असते.

आणि, माझ्या दृष्टीने तुमचे हित एकच आहे, तुम्ही बंधमुक्त व्हावे, माझ्याकडून काहीतरी तुम्ही मिळवावे. माझ्यातून तुमचा उत्कर्ष व्हावा."

- श्री माताजी २१-५-८४

**आपल्यामधील कमतरतांच्या साठी कोणी सबबी सांगू नये.**

"तुम्ही चुकीचे काम करता तेव्हा तुमच्यापैकी अनेक जण म्हणतील "माझ्या डाव्या स्वाधिष्ठानावर पकड होती" काही म्हणतील "माझ्यात भूत होते" तर आणखी काही दुसऱ्या कशाला तरी दोष देतील.

तुम्ही कशालाही दोष द्या, पण कोणी तुम्हाला विचारले आहे? तुम्हीच स्वतःला विचारता, तेव्हा माझी भक्ति म्हणजे, स्वतःला सामोरे जाऊन, आपण काय करतो ते स्वतःच पहावे."

- श्री माताजी २८-५-८५

## आपण रोज नियमितपणे ध्यान करायला हवे.

"वृद्धिंगत होण्यासाठी आपण रोज ध्यान करायला हवे. रोज, अगदी रोजचे रोज, ध्यान करणे महत्त्वाचे आहे. एखादे दिवशी जेवण करू नका. खाऊ नका, कामावर जाऊ नका, रोज करता त्यापैकी एखादी गोष्ट एक दिवस करू नका. पण रोज ध्यान करा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे."

- श्री माताजी १२-८८

"ध्यानासाठी अधिक वेळ देण्याची आवश्यकता नाही. पण जो काही वेळ तुम्ही देता व जे काही तुम्हाला त्यातून प्राप्त होते, ते बाह्यात दिसून यायला हवे. तुमच्यातून ते बाहेर यायला हवे, दुसऱ्याला ते द्यायला हवे. अशा स्थितीचे संत तुम्हाला व्हायचे आहे. गहनतेमध्ये गेल्याशिवाय इतर सहज योग्यांना तुम्ही वाचवू शकणार नाही. व जे सहज योगी नाहीत त्यांना आपण वाचवू शकत नाही."

- श्री माताजी २७-७-८१

"ध्यान आपल्या जीवनाचा अविभक्त भाग आहे. मानवाला जसा श्वास घ्यावा लागतो तसे तुम्हाला ध्यान करायला हवे. ध्यान करणार नसाल तर तुम्ही कधीही मोठे होणार नाही. तुम्ही तसेच रहाल. जेव्हा ध्यान करून गहन होता, तेव्हा तुमच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. उथळपणाचा काही फायदा होणार नाही. या कारणासाठी ध्यान करायला हवे. पण ते फार वेळ नाही."

- श्री माताजी २-५-८७

"जे सहज योगात येतात आणि ध्यान करीत नाहीत व उन्नत होत नाहीत, ते नष्ट होतात अथवा सहज योगाच्या बाहेर फेकले जातात."

- श्री माताजी २८-७-८५

## आपापसातील संबंध विकसित करण्यासाठी कार्यरत असावे. मर्यादांची जाणीव असावी.

सहज योग्यांच्या बरोबर तुमचे संबंध आदर्श असावेत. नाहीतर एखादा स्क्रू ढिला असायचा. सर्व संबंध आदर्श करा. समजा एक व्यक्ति अहंकारी आहे, असे तुम्हाला वाटते, त्यावेळी प्रथम तुमच्यात काही बिघाड आहे का ते पहा, "मी परिपूर्ण आहे का? मी व्यवस्थित आहे का?

मी अहंकरी असेल, तर प्रथम मी ठीक झाले पाहिजे. मी अहंकारी नाही आणि म्हणून दुसऱ्यावर प्रभुत्व चालवीत नाही, असे लक्षात आल्यास त्यांच्याशी गोड वागुन त्याचा अहंकार खाली आणा, त्यांच्याशी प्रेमाने वागा, म्हणजे त्याचा अहंकार खाली येईल. काहीही करून आदर्श संबंध प्रस्थपित करा. ते अगदी सोपे आहे.

एक दुसऱ्यांशी परिपूर्ण संबंध असावेत. स्वतःशी मात्र तुमचे संबंध कठोर असावेत. स्वतःला स्पष्टपणे बजावायला हवे की - "मला माझे हे शरीर परमेश्वराला अर्पण करायचे असेल तर स्वतःला परिपूर्ण करायला हवे." दुसरे म्हणजे दुसऱ्यांशी आदर्श संबंध बनवायलाच हवेत. सहज योग्याचे दुसऱ्या सहज योग्याशी नाते महान असते. सर्वात मोठे नाते ते आहे. तुमच्या बहिणीशी, भावाशी, तुमचे संबंध आदर्श असावेत.

- श्री माताजी

# वाढदिवस पूजा

## (आपल्या स्वतःकडे लक्ष द्या. भाषणाचा सारांश)

दिल्ली : १९.३.८९

सहज योगाचे काम करताना वेळ कसा जातो हे कळत नाही. जवळजवळ अठरा वर्षे आपण सहज योग करीत आहोत. त्याची प्रगती चांगलीच होत आहे असे दिसत आहे. माझ्या जन्मदिवसाच्या दिवशी ही चांगली गोष्ट सांगायला मला आनंद वाटतोय. विशेष गोष्ट अशी सांगावीशी वाटते ती म्हणजे सहज योगात आपण गहनतेत उतरले पाहिजे, आणि ही गहराई आपल्यातच आहे. आपल्याला कुठे शोधायला नको. गहनता वाढविताना आपण सर्वप्रथम हे पाहिले पाहिजे की आपण गहनतेच्या स्थितीत कोठपर्यंत पोहोचलो आहोत, व हे जाणण्यासाठी एक सरळ मार्ग म्हणजे (आत्मपरिक्षण) स्वतःकडे नजर वळविणे. आपण लोकांशी व्यवहार कसा करतो, आपण कशा पद्धतीने विचार करतो, आपली चाल-चलणूक कशी आहे, वगैरे.

जसे सुरुवातीला दिल्लीत काम सुरू केले तेव्हा लोकांची मानसिकताच वेगळी होती, पूजेबद्दल लोकांना काहीच माहित नव्हते. लोकांनी पूजेचे सर्व साहित्य प्लॅस्टिकच्या भांड्यातून आणले होते, प्लॅस्टिकच्या भांड्यात कुंकु वगैरे आणले होते. हे पाहून माझीच परिस्थिती इतकी विचित्र झाली की ह्या लोकांचे काय होणार याचीच मला चिंता वाटली, कारण त्यांनी पूजा साहित्य प्लॅस्टिक मधून आणले होते. पूजेसाठी साधा घरातलाच एक साधा तांब्या आणला होता. मला भिती वाटली की श्री हनुमानाचा क्रोध किंवा श्री गणेशांचा कोप झाला तर ह्या दिल्लीवाल्याचे काय होईल? प्लॅस्टिकमधून आणलेल्या साहित्याने पूजा करणे योग्य नाही हे ह्या लोकांना कसे सांगावे हे मला कळेना.

एका सद्‌गृहस्थांनी आम्हाला पूजेसाठी जागा दिली होती. त्यांच्या घरात काही सुंदर वस्तू ठेवलेल्या होत्या. त्या पूजेनंतर लोकांनी चोरून नेल्या. ही घटना घडल्यानंतर दुसऱ्यावेळी त्या सद्‌गृहस्थांनी सांगितले की माझ्या जागेत पूजा करा पण घरात न करता कंपाऊंडमध्ये करा, पाण्याची वगैरे व्यवस्था बाहेरच करू. हे मला फार अपमानास्पद वाटले. अशा तऱ्हेने दिल्लीत सहजयोगांची सुरुवात झाली.

त्यावेळी दिल्लीत माझ्याकडे जगभरातले सारे आजारी लोक सकाळपासून संध्याकाळ पर्यंत ठिक करून घेण्यासाठी येत व त्यांना ठिक करून माझे हात दुखून येत. सर्वांना स्वतःची मुलगी, मुलगा, आईबाप नातेवाईक ह्यांचीच चिंता, त्यामुळे सकाळ संध्याकाळ हेच काम मला करावे लागत असे. त्यानंतर माझ्या भावाच्या घरात सुरूवात केली. तेथेही हेच, सकाळ-संध्याकाळ लोक आपल्या आजारी- अडचणीत असलेल्या नातेवाईकांना घेऊन येऊ लागले, आणि आग्रह करायचे कि तुम्ही यांना पाहिलेच पाहिजे, भले मला चारचार वाजेपर्यंत जेवण नाही मिळाले तरी चालेल. त्यावर कडी म्हणजे फोनवर फोन यायचे व आग्रह धरायचे की आम्हाला श्री माताजीशी बोलायचय "जसा काही त्यांनी त्यांचा माझ्यावर अधिकार गाजवायला सुरूवात केली. त्यानंतर जेव्हा फॅरिनर (वेस्टर्न सहजयोगी) येऊ लागले तेव्हा तर मी अगदी त्रस्त होऊन गेले. त्यानंतर तर आजाऱ्यांची रिघच लागली. सर्वांना आपण स्वतः (VIP) विशेष आहोत, आपली मुलंबाळ फार महत्वाची असे वाटायचे. ह्या लोकांत कित्येक मंत्रीही होते. इतकेच नाही तर मला (जबरदस्ती) त्यांनी हॉस्पिटल मध्ये नेले, तेथे मी लोकांना ठिक केले. मी म्हटले हे दिल्लीतील सहजयोगी इतके उथळ कसे? हे सहजयोगाचे कार्य काय करणार?

हे सर्व पाहून माझा भाऊ रागावला, तो म्हणाला तुम्ही सर्व स्वार्थी लोक आहात माझ्या बहिणीला फार त्रास देता. ह्याला बरे करा - त्याला बरे करा - धड रहायला घर नाही आणि तुम्ही काय सहजयोग करणार? आजार बरे करून घ्यायला येणाऱ्यांना त्याने परत पाठवायला सुरूवात केली. यामुळे सहज योग्यांच्या संख्येत घट झाली.

पुढे परदेशी सहजयोगी यायला लागले. त्यांची लग्न आम्ही सहज योगात करून दिली, तर ह्या लोकांनी त्या परदेशी लोकांकडे फॉरिन एक्सचेंज मागायलासुद्धा मागेपुढे पाहिले नाही, येवढेच नव्हेतर आम्ही विलायतेत आलो तर आमची रहायची व तेथील खर्चाची सोय तुम्ही केली पाहिजे वगैरे सांगायला लागले. दिल्लीत परदेशी लोकांची राहण्याची व्यवस्था केली होती तेव्हा दिल्लीवाल्यानी त्यांच्या (जेवणाचा) खाण्यापिण्याचा खर्च इतका काही घेतला की माझी सर्व बँकच खाली झाली - दिवाळं दिघायची वेळ आली, कारण मी परदेशी लोकांकडून फार पैसे

घेत नव्हते. दोन वर्षात माझे सर्व पैसे संपविले. फारच खालच्या पातळीचे लोक होते, त्यांना "परम्"चा अर्थच माहित नव्हता. त्यांना फक्त आजार बरा करून घ्यायचा एवढेच माहीत होतं. त्यांच्या आजारी नातेवाईकांना फोटो देऊन सहजयोग करायला सांगा ते सर्व ठिक होतील असे सांगितले तर ते म्हणत की ते सहजयोगाला मानत नाहीत, फोटो घेणार नाहीत. तेव्हा मी त्यांना विचारले की मग मी त्यांना का ठीक करू? तेव्हा ते म्हणाले की तुमच्याकडे व्हाईस प्रेसिडेंड वगैरे येणार आहेत.. अशा तऱ्हेने ते माझ्यावर दबाव आणू लागले. मी त्रस्त झाले. मी विचार केला आपल्याकडे फार पैसा नाही तर आपण परदेशी लोकांना भारतात बोलवूच नये. त्यावेळी दिल्लीतील सहजयोग्यांच्या डोक्यात आले आणि ते म्हणू लागले की श्री माताजी थोड्या परदेशी लोकांना बोलवू ते आमच्या सगळ्यांच्या घरी राहतील व ते जो राहण्याचा-खाण्या पिण्याचा पैसा आम्हाला देतील त्यातला जो पैसा बचत होईल तो आम्ही सहज योगाला देऊ. (आश्रमासाठी)

वस्तुतः महाराष्ट्रियांपेक्षा दिल्लीतील लोकांकडे पैसा जास्त आहे. सर्वांकडे मोटारी आहेत, महाराष्ट्रात कोणाकडे नाही. मी मुंबईला गेले तर कोणा एकाद्याकडे असल्यास मोटार मला जाण्यासाठी मिळेल यांची शंका असायची. पण महाराष्ट्रात असा पैशाचा त्रास कधी झाला नाही. दिल्लीतील लोक फार कंजूष आहेत. सगळे मोटारीतून फिरतात, चांगले कपडेलत्ते करतात, बायका चांगले दागिने घालतात उत्तम प्रकारचे, पण परमात्म्याच्या कार्यासाठी पैसे नाहीत त्यांच्याजवळ.

मुंबईत आम्ही जेव्हा आश्रमांचे काम सुरू केले तेव्हा लोक पैसे आणून द्यायला लागले, पण मी त्यांना सांगितले की आम्ही अजून ट्रस्ट स्थापन केलेला नाही तो स्थापन झाला की मग तुम्ही पैसे द्या. मला तुम्हाला सांगायला आनंद वाटतो की जेव्हा ट्रस्ट स्थापन झाला त्यावेळी कोणी हजार, कोणी तीन हजार, कोणी पाच हजार असे पैसे दिले, पण एकानेही हजार रुपयांपेक्षा कमी दिले नाहीत, पण जास्तच दिले. त्या काळात चार साडेचार लाख रुपये जमा झाले. त्या पैशातूनच आम्ही ठिक ठिकाणी जमीनी खरेदी केल्या. तुम्हाला माहितच आहे मला तुमच्या पैशाची जरुरी नाही. तो पैसा सहजयोगाच्या निरनिराळ्या प्रोजेक्ट साठीच वापरला जातो. ज्यावेळी आम्हाला दिल्लीत एक चांगली जागा मिळत होती त्यावेळी आम्ही विचार केला की दिल्लीतील लोकांच्याच पैशातून ती खरेदी करू. पण पैसा जमा झाला नाही, तर इथे जो पैसा दिला आहे तो महाराष्ट्रातून जमा झाला होता त्यातील आहे. ह्याचा अर्थ असा नाही की आपण तो कसाही खर्च करायचा.

दिल्लीत स्त्रिया खूप फॅशनेबल आहेत म्हणे - त्यांना रोज निरनिराळ्या चांगल्या फॅशनच्या साड्या लागतात. त्यांना मी नायलॉनची साडी दिली तर त्या म्हणतात आम्ही सिफॉनची साडी नेसतो नायलॉनची नाही. तुम्ही जर एवढे पैसेवाले आहात तर एखादेवेळेस तरी सहजयोगासाठी (आश्रमासाठी) पैसे द्या ! मी माझे खूप पैसे सहजयोगासाठी खर्च केले. व त्यावरून माझे माझ्या पतींशी भांडण झालं. त्यावेळी ते मला म्हणाले "तू एक भली गुरु आहेस तू माझी बँक खाली केलीस मी ऐकून आहे की गुरु लोक बँका भरतात तू तर माझी बँक खाली केलीस." "मोठी शरमेची गोष्ट आहे, की मला तुमच्यामुळे हे सर्व करायला लागले. इथले पुरुष लोकसुद्धा खूप खर्चिक आहेत. त्यांना मोटार उडवायला पाहिजे, टेलिव्हीजन पाहिजे, महाराष्ट्रात किती जणाकडे टेलिव्हिजन आहे? हे पाहिजे ते पाहिजे पण सहज योगांसाठी पैसा नाही.

सुरूवातीला आम्ही जेव्हा ट्रस्ट स्थापन केला तेव्हा जवळजवळ चार-साडे चार लाख रुपये जमा झाले. तेव्हा किती सहजयोगी होते? महाराष्ट्रातील लोक तुमच्यापेक्षा गरीब आहेत, व त्यांच्यात कोणी फार वरच्या हुद्द्यावर असलेला कोणी सहजयोगी नाही किंवा कोणी एक मोठा बिझनेस मन् ही नाही. महाराष्ट्रात अश्या जागी, गुजराथी, मारवाडी, सिंधी वगैरे लोक आहेत, व ह्यानीच सर्व उद्योग हातात घेतले आहेत. हे लोक किती कर्मठ आहेत व ते कश्या प्रकारे काम करतात हे तुम्हाला माहीत आहेच. इथे सुद्धा बरेच धंदेवाईक लोक आहेत. पण ते फार घमेंडखोर आहेत. ते सहजयोगाला चांगले नाही. तेव्हा मी विचार केला, दिल्लीत फार स्वार्थी लोक आहेत ते स्वतःचाच फक्त विचार करतात यांना काय परमेश्वर मिळणार?

पण हळूहळू (माझ्या) आईच्या प्रेमामुळे तुम्ही लोक बदलत गेलात. तुमच्या वागण्यात खूप फरक पडला आणि आनंदाची गोष्ट म्हणजे आता तुम्ही खूप सुधारलात. एका जमान्यात गांधीजीनी आवाहन केल्यावरून आमच्या आईने आपले सर्व दागदागीने त्यांना दिले मी ही माझ्या हातातील बांगड्या काढून दिल्या, तसेच आमच्या प्रमाणे बऱ्याच जणींनी आपापल्या अंगावरचे दागीने दिले. देशासाठी हा त्याग केला. सहज योगात येऊन सर्वांचे भलेच झाले. काहींचे आजार बरे झाले. काहिंची परिस्थिती सुधारली, सर्वकाही ठीक झाले, पण सहजयोगासाठी पैसा द्यायची तयारी नाही. उदाहरणच बघा ! दिल्लीच्या आश्रमांचे काम अर्धवट पडले आहे. लोक माझ्याकडे पैसे मागताहेत त्या कामासाठी. आज जर सर्वांनी पैसे दिले असते तर हा आश्रम पूर्ण झाला असता की नाही? असुदे, आज मी तुम्हाला टोकन म्हणून रुपये अकरा हजार त्यासाठी देते व नंतरही लागले तर आणखी पाठवीन, पण तुम्ही विचार करा की हा आपला आश्रम आहे. आपण ह्यासाठी पैसा जमा करायला हवा. सहजयोगात आल्यापासून आपल्याला किती लाभ झाला, याचा जर तुम्ही

विचार केलात तर तुमच्या लक्षात येईल की आपण किती कंजूष आहोत, कामचुकार आहोत. तर लक्षात घ्या की आपल्यात गहनता नाही, अजूनही आपल्या नातेवाईकांची रोगराई बरी करण्यासाठी आपण श्री माताजींना सांगत राहतो. अशा प्रकारे कमी दर्जाचे लोक जास्त आहेत. गहनताच नाही ! जर तुमचे आईशी चांगले संबंध असतील तर काही सागायचे गरजच नाही. नुसते श्री माताजीना त्यांच्या आजाराबद्दल सांगताच ते तिकडे बरे झाले असे खूप लोक आहेत. पण आपल्यातील गहनता कमी आहे जेव्हा आपल्यातील गहनता कमी होते तेव्हा हे सर्व विपरीत असे होते.

सहज योगात येऊन पैसा कमवायची वृत्तीही काही लोकांत आहे. ही वृत्ती हीन आहे. पुस्तके विकायची वगैरे वगैरे. सहजयोग, सत्तेसाठी, पैसे कमविण्यासाठी, नातेवाईकांची रोगराई बरे करण्यासाठी नाही तर तो तुमच्या स्वतःच्या हितासाठी आहे. तुम्हाला तुमचेच हित साधायचे आहे, व 'परमपद' प्राप्त करायचे आहे. जोपर्यंत आपण याचा निम्चयच करत नाही की आपल्याला 'परमपद' प्राप्त करायचेच आहे तो पर्यंत बाकी सर्व व्यर्थ आहे. कौटुंबिक भांडणे, नवरा-बायकोची भांडणे, मुलांची भांडणे या सर्व मला सांगायच्या गोष्टी नाहीत. परमपद जर तुम्ही मिळविलेत तर या सर्व गोष्टी तुमच्या तुम्हीच सोडवाल, पण हे 'परमपद' आपण प्राप्त केले पाहिजे. त्यातही एक मोठा दोष राहतोच तो तुम्हाला सांगायला मलाही योग्य वेळ चालून आली आहे. परमपद प्राप्त केले की अहंकार बळावतो. त्याकडे बघत रहा की कोणत्या कोणत्या गोष्टीचे आपल्याला महत्व वाटते व त्याचा अहंकार आहे.कोणत्या गोष्टींना आपण जास्त महत्व देतो वगैरे. आपण आपल्या विचारांकडे पाहिले पाहिजे, की आपण कोणत्या गोष्टी अत्यंत महत्वाच्या समजतो, कोणती गोष्ट करणे अत्यंत महत्त्वाची समजतो. काही लोक असे आहेत की ते परमपद मिळविणे हीच आपल्या आयुष्यातील महत्वाची गोष्ट समजतात. आणखी काही नाही, ते ठीक आहेत. त्याचे बाकीचे सर्व ठिक आहे व त्यांची नोकरी-चाकरी, संसार सगळं काही सुरळीत चालू आहे.

तेव्हा आता माझ्या वाढदिवसादिवशी दिल्लीकरांनी याचा विचार करावा आणि ठामपणे निश्चय करावा. आता माझेही वय ६६ वर्षे झाले आहे. माझ्या आयुष्यातील एकही क्षण मी वाया घालवला नाही व सहज योगाचे काम केले. मी एवढी मेहनत करीत आहे, आणि अजुनही करायला तयार आहे. तुम्हाला माझ्या एवढी मेहनत करण्याची गरज नाही. तुम्ही फक्त आत्मपरिक्षण करा की सहजयोगासाठी मी काय केले? आणि ज्यामुळे मी या सुंदर स्थितीला पोहोचलो नाही व ते का? सहजयोगासाठी काय केले?

खुप लोक मला पैसा देतात, जमिनी देतात पण मला काय जरुर आहे? मी ते सर्व सहज योगालाच देते, म्हणून तुम्ही जे

**प्रत्येक आठवड्यात कमीत कमी एका सार्वजनिक कार्यक्रमात आपण भाग घ्यायला हवा.**

एका बाजूला, मला मूर्ख लोक आहेत असे दिसते आणि दुसऱ्या बाजूला अनेक प्रामाणिक साधक आहेत. त्यांच्या पर्यंत कसे पोहोचायचे. चिखलाने झाकला गेलेला हिरा असावा असे ते आहेत आणि चिखल तरी किती आहे. चिखलात रुतलेला हिरा बाहेर काढण्यासाठी, अज्ञानाच्या खाणीत खोलवर जावे लागते व त्या ठिकाणी चिखलात हरवलेला हिरा सापडतो.

मला अशी काळजी वाटते की हा चिखल त्यांच्या बुद्धिला त्यांच्या दृष्टिला व जे काही इतर त्यांच्याकडे आहे त्या सर्वांना इतका भरून टाकेल त्यांना कधीच साक्षात्कार मिळणार नाही, ते घालवून बसतील."

- श्री माताजी १९-१-८४

"सहज योग हा विषय अंतर्यामी फार खोलवर जायला हवा. कारण सहज योग जर तुम्हाला समजला असेल - तुम्हाला समजला की नाही अथवा तुम्ही जाणले आहे की नाही हे मला माहिती नाही - तर सहज योग आपण अनुभवातून शिकलो - तुम्ही अनुभव घ्यायचा व मग विश्वास ठेवायचा. मी जे सांगते आहे त्याचा परिणाम तुमच्या मनावर होतो, असे नव्हे तर तुम्ही स्वतः अनुभवता व शिकता.

- श्री माताजी २१-५-८५

सहज योग जाहिराती देण्याने अथवा माझ्या फोटोने कार्यान्वित होणार नाही. तो कार्यान्वित होणार आहे. तुमच्या कायर करण्याने, जबाबदारी घेण्यामुळे आणि सहज योगाला उचलून धरण्याने सहज योगाचा प्रसार करून त्यास प्रस्थापित करणे, ही तुमची जबाबदारी आहे."

- श्री माताजी, श्री विराट पूजा.

काय द्यायचे आहे ते सर्व सहजयोगाला द्या मला नको. माझ्यावरील प्रेमाने वाढदिवसानिमित्त जर तुम्ही काही दिले तर मी ते घेते. खरं तर मला कशाचीच जरुरी नाही. मी सतत आग्रह करते की, खर्च कमी करा म्हणजे बचत होईल, आणि तो पैसा सहज योगासाठी वापरता येईल. आपल्याला ठाऊकच आहे की आपल्याला पैसा जमविणेसाठी इतर काही मार्ग नाही, व आपण दान घेत नाही तसेच अशा - तशा लोकांकडूनही आपण पैसा घेत नाही, म्हणून तुम्हाला माझी हीच विनंती आहे की तुम्ही स्वतःला ओळखा. जोपर्यंत तुम्ही इतर भौतिक गोष्टीत मन गुंतवाल, "परमात्म्याचा" विचार करणार नाहीत तोपर्यंत सहज योगात तुम्हाला जे प्राप्त व्हायला पाहिजे ते होणार नाही. नोकरी धंदा इत्यादिंचा विचार केला तर अस्सल चीज तुम्हाला प्राप्त होत नाही असे हे व्हिशस सर्कल आहे. एकदा तुम्हाला सहज योगात गहनता आली की इतर गोष्टीचा विसर पडतो. जोपर्यंत तुमच्यात निगेटिव्हिटीज् आहेत तोपर्यंत तुमचे काम होत नाही. आता हेच पहा- कुलपे उघडत नव्हती, मी विचारले कोणी लावली ज्यानी लावली त्यांना सांगितले जरा बाहेर जा? किल्ल्या इकडे द्या, तर कुलपे उघडली. अशाप्रकारे निगेटिव्हिटी असेल तर काम होत नाही, आणि तुम्ही त्या स्थितीला आलात तर कामे व्यस्थित पार पडतात, इतकी सुंदर होतात की आपल्याला वाटते हे मला वाटलेही नव्हते. सहजयोगांची हीच किमया आहे चमत्कार आहे. जे समोर येईल त्याचा स्विकार करा. प्रेमाने स्विकार करा तेच हितकारक आहे. स्वतःला तोलत रहा. सहजयोगात जशी आपली प्रगती होईल तसे तसे तुमच्या लक्षात येईल, तुम्हाला सर्व देवी-देवतांचे आशिर्वाद आहेत व तुम्ही जेथे जाल तिथे तिथे तुम्हाला त्यांचे मार्गदर्शन लाभेल. कोणी तुम्हाला त्रास देऊ शकणार नाही. तुम्ही एकदम सुरक्षित असता. जो तुम्हाला त्रास देईल तयाला खूप त्रास होईल आपोआप. सर्व प्रकारे तुमची तब्येत, परिस्थिती वगैरे उत्तम राहील. पण हे सुद्धा सहजयोगातील प्रगतीच्या आड येणारे एक प्रलोभन आहे. हयात तुम्ही गुंतलात तर भटकाल. काही जण प्रलोभनात अडकले खूप पैसा मिळविला सहजयोगातून बाहेर गेले वगैरे पण नंतर कॅन्सर झाला म्हणून परत सहजयोगात आले, व सांगू लागले कि धंदा व्यवसायामुळे दूर गेलो आता सहजयोगात परत आलो. आपले मन सहजयोगात रमले पाहिजे सहजयोगाच्या प्रत्येक कार्यक्रमात भाग घ्यायाला पाहिजे. कलेक्टिव्हीटीत रहायला पाहिजे. सर्व पूजांना जिथे असतील तिथे हजर रहायला पाहिजे. पूर्ण चित्त सहज योगात दिले पाहिजे, व पूर्ण समर्पण पाहिजे, बाकी सर्व गोष्टींची परमेश्वर काळजी घेईल.

तुम्हाला माहित आहे तुमच्या आईला बँकेचे पैशाचे व्यवहार काही समजत नाहीत. जे माझ्या बरोबर असतात त्यांना ह्याचे आश्चर्य वाटते. आजच्या कायदे-कानू वगैरे बद्दल मला काही समजत नाही व जर काही जास्त सांगितले तर डोकं फिरून जात. पण तसं पाहिले तर मला सर्वांची जाण असते. एखाद्यावेळी कायद्यात मी एखादा असा पॉईंट काढते की भले-भले वकीलसुद्धा मला म्हणतात श्री माताजी हा पॉईंट तुम्हाला कसा सुचला? कारण दृष्टीमधे सुक्ष्मता आहे. सर्व चांगल्या गोष्टीच तुम्हाला मिळतात. बऱ्याच गोष्टी स्वस्तही मिळू शकतात. कारण दृष्टीत सुक्ष्मता येते. चित्त सुक्ष्मात पाहिजे बाह्यात नको. आनंदात रहायचे. प्रलोभनात नाही.

सुरवातीला मी दिल्लीला आले आणि आता आले यात खूपच सुधारणा झाली व फरक झाला आहे. अजून खूप परिवर्तन व्हायला हवे. खुल्या दिलाने रहायला पाहिजे. एक महिला मला म्हणाली "श्री माताजी मी सहज योगाला काही पैसे द्यावे असा विचार करत होते पण त्याऐवजी मुलीला दागिनेच करून टाकले. श्री माताजी म्हणाल्या तुम्ही तुमचे दागीने बँकेत ठेवलेत, तुमची मुलगीही बँकेत ठेवेल व तीची मुलगीही बँकेत ठेवेल, सर्व बँकेतच ठेवले जाईल, त्यापेक्षा तुम्ही जर एखादी वस्तू सहजयोगाकरिता केली असती तर संपूर्ण कलेक्टीव्हीटीला त्याचा आनंद मिळाला असता. सर्वांचे चीज होईल. अश्या प्रकारच्या गोष्टीत प्रलोभन येते. पण सर्वात सुक्ष्म प्रलोभन म्हणजे 'मी केले'.... मी आश्रमाची जागा घेतली, मी आश्रमासाठी पैसा जमा केला; मी आश्रम बांधायला मदत केली; माझ्या मुळे हे सर्व झाले; मी ह्याला ठीक केले. मी-मी-मी- आणि मी केले. तसेच मी लिडर आहे, मी ऑर्गनाझर आहे, मी मोठा माणूस आहे वगैरेवगैरे. ह्या सर्वापासून सावध रहायला पाहिजे. मी हे केले मी ते केले. यावरून आपल्याला असे वाटायला लागते की मी सहज योगात खूप उंचीवर गेलो आहे, पण त्याच वेळी तुम्ही त्या उंचीवरून धप्पकन खाली पडता. तरी या 'मी' पासून सर्वांनी सुटका करून घ्या. नुकतीच डेहराडून मध्ये मला एक महिला भेटली ती मला फार गरम वाटली, तीचे हातही गरम होते. तिच्या मुलाचे हातही फार गरम होते. मी तीला विचारले तुमचे हात एवढे गरम का आहेत? तुम्ही काय करता? ती म्हणाली "श्री माताजी सहजयोगात माझा स्पॉंडिलॅटिस बरा झाला, माझा डायबेटीस बरा झाला, म्हणून मला सेंटर चालवावयाचे आहे, परंतू मला परवानगी मिळाली नाही तरीही मी सेंटर चालविते" त्यावर श्री माताजी म्हणाल्या "अजून आपण ठीक होण्याच्या स्थितीत आहात, सेंटर चालविण्याच्या नाही" आपण सेंटर चालविणे बंद करा.

ज्याने त्याने स्वतःला पारखायचे आहे. **हे पुनरुत्थानाचे लास्ट जजमेंट आहे.** आपले चित्त कोठे धावते आहे त्यावर नजर ठेवायला हवी, मी काय विचार करतो यावरही नजर ठेवायला हवी. त्यावर श्री नामदेवाने फार सुंदर दृष्टांत दिला आहे,

ग्रंथसाहेब मध्ये. "एक मुलगा पतंग उडवित आहे - एकीकडे तो मित्राशी गप्पागोष्टी करीत आहे पण त्याचे सारे चित्त मात्र (लक्ष) पतंगावर आहे." "एक स्त्री कमरेवर मुलाला घेऊन सर्व घरकाम करीत आहे, पाणी भरत आहे, इतर काही करते आहे पण तीचे सारे लक्ष कडेवरच्या तीच्या मुलावरच आहे." "खूप बायका डोक्यावर घड्याची दूड घेऊन मैत्रिणीबरोबर थट्टा मष्करी करीत पाणी आणत आहेत पण त्यांचं सारं लक्ष त्यांच्या घड्यावर आहे." तेव्हा आपणही सर्व गोष्टी करताना आपले लक्ष कोठे आहे यावर नजर ठेवायला हवी.

अजून लोक मला भेटण्याचा आग्रह धरतात. भेटू दिले नाही तर नाराज होतात, रडतात, ओरडतात. हा एक प्रकारच्या अहंकारचाच प्रकार आहे. वास्तविक आज माझा वाढदिवस आहे त्यादिवशी तुम्ही हे असे करणे योग्य नाही. आईला तुम्ही प्रसन्न ठेवले पाहिजे. तुमचाही वाढदिवस असतो, त्या दिवशी तुम्हाला असे कोणी केलं तर चालेल का? तुमचा वाढदिवस तुम्ही ज्या दिवशी जागृती (सहजयोगात) घेतलीत तो दिवस. मी तर अनादि आहे. माझे वय हजारो वर्षांचे आहे. माझा कसला वाढदिवस करता? तुमचा वाढदिवस मनवायला हवा कारण तुमचा सहज योगात पुनर्जन्म झाला आहे, व तुम्ही सहजयोगी म्हणून दिमाखाने इकडे तिकडे फिरत आहात. वाढदिवस म्हणजे मनुष्य वाढत जातो, लहान होत नाही. पण सहज योगात कधी कधी असे होते. बघता-बघता चांगला मनुष्य एकदम बिघडतो, त्याची चौकशी केल्यावर कळते की तो 'ऑफ' झाला. म्हणजे! म्हणजे सहजयोगातून बाहेर गेला, सोडून गेला. एवढी अवघड गोष्ट ही नाहीये. सहजयोगात वाढणे सहज सोप आहे, प्रत्येकाने स्वतःच्या दर्जाचे परिक्षण करायला पाहिजे. सांगायची सुद्धा जरूरी नाही. नुसता विचार केला तरी काम होईल मग समक्ष भेटायचे कशाला? तुम्ही जर मला तुमच्या हृदयात स्थान दिलेत तर तुम्ही नुसते खाली झुकलात तरी माझे तुम्हाला दर्शन होईल. भेटून काय करणार आरश्यासमोर तुम्ही उभे रहा आणि स्वतःलाच विचारा की काय आजचा प्रोग्रॅम काय आहे? आपण सर्व सहजयोगी आहात. तुमची स्वतःची विशालता पहा. तुम्ही असे कराल तर तुमची विशालता एवढी वाढेल की आमच्या विशालतेच्या मदतीची गरज पडणार नाही, असे काही लोक आहेत. सहज योगात की जे स्वतःच्या विशालतेला ते आव्हान देतात.

यानंतर आपण आता एकदम गणपती पुळ्यालाच भेटू. प्रत्येक वाढदिवस मला आठवत राहतो. तुम्ही किती प्रेमाने माझा वाढदिवस साजरा करता ते आठवते. पण आपण जेव्हा पुन्हा भेटू तेव्हा तुम्ही एकदम स्वच्छ, एखाद्या वृक्षासारखे दिसावेत अशी माझी इच्छा आहे. अंतर्बाह्य निर्मल. पण इथे तर फार कमी लोक असे दिसतात, बाकीचे लोक येतात फायदा करून घेऊन निघून जातात. तुम्ही कसे मॅनेज करता त्याचा विचारही करत नाहीत. असे न व्हावे हीच इच्छा आहे. पुढच्या वर्षीपण इथेच वाढदिवस साजरा व्हावा अशी माझी इच्छा आहे व बरेच लोक मला प्रगती झालेले दिसावेत. एकदम वृक्षासारखे. प्रत्येक व्यक्तिने कमीत कमी शंभर लोकांना तरी सहज योग सागायला हवा. महाराष्ट्रात गौरीची पूजा करतात तेव्हा हळदी कुंकु करतात. आमचा फोटो ठेवतात, पूजा करतात परिचिताना बोलावतात अशावेळी सर्वांना सहजयोगाबद्दल सांगतात. परिचित, नातेवाईक, सर्वांना सहजयोग सांगितला पाहिजे. सहजयोगामुळे कसे फायदे होतात, कसा करावा हे सर्वांना सांगितले पाहिजे. लग्न समारंभाला गेलं की नुसते बाह्य गोष्टींकडे कपडे-दाग दागिने यांचे कडे लक्ष व चर्चा करणे सोडून द्यावे व आपल्या आप्त, मित्रांना सहजयोग सांगावा. सर्व विश्वाशी नाते जोडण्याचा प्रयत्न करायला हवा. ह्या वर्षी फ्रान्समध्ये आमच्या वाढदिवसानिमित्त सेमिनार आयोजित केले आहे. सर्व युरोपमधून सहजयोगी जमले आहेत १८ तारखेपासून सुरू झाले आहे. ५-६ दिवसच सेमिनार आहे. निरनिराळ्या देशात फिरून ते सहज योगाचा प्रसार करतात. इथले लोक गणपती सारखे बसून राहतात. कोठे जात नाहीत. "नॉईडा" पर्यंत गेले हेच खूप ! मला वाटते नॉईडाच्या लोकांनी तुम्हाला खेचून घेतले असावे. हळूहळू प्रसार होत आहे. पण जोरात प्रसार झाला पाहिजे. वेळ फार कमी आहे. इतर लोक त्यांच्या गुरुनी त्यांना लुटले तरी स्वतःच्या गुरुचा उदोउदो करीत असतात. सर्वांनी आपल्या नातेवाईकांना परिचिताना सहज योगाबद्दल सांगावे. पत्र लिहून कळवावे, की सहजयोग कसा फायदेशीर आहे वगैरे. कोणाला नुसते जेवायला बोलवू नका बोलावले तर सहजयोग सांगा, नाहीतरी ते तुमची निंदाच करतील. तुम्हाला सहजयोगात आल्यावर सत्य माहित झाले आहे, इतरानाही त्याचा लाभ होऊ दे !

आजच्या दिवशी जावे लागणार याबद्दल मला वाईट वाटते आहे पण तिकडेही सर्वजण (फ्रान्स सेमिनारमध्ये) माझी वाट पहात असतील. अशा प्रकारे आनंदात इथले दिवस गेले. रात्री दोन-दोन चार-चार वाजेपर्यंत कधी झोपत नाही व दिवसभर मेहनत करते. तुम्ही इतकी मेहनत करावी असे मला वाटत नाही, पण सहजयोगाची गरज तुम्हाला आहे, मला नाही, हे लक्षात घ्या. तुम्हाला सहजयोग द्यायला पाहिजे, मिळाला पाहिजे, ह्या विचारात मी असते. ती तुमची वस्तू आहे. तुम्हाला प्राप्त झाली पाहिजे. असे समजा की, माझ्या जीवनाचा एवढाच खरा अर्थ आहे. माझ्या जीवनामुळे तुमच्या कुंडलिनीचे जागरण झाले, व तुम्ही या स्थितीला पोहोचलात की ज्या योगे तुम्ही दुसऱ्यांना जागृती देऊ शकता. साऱ्या दुनियेत परिवर्तन येऊ शकते. तुम्ही लोक नसता तर माझ्या जीवनाला काही अर्थच नव्हता.

आता तुम्ही लोक आहात, तुमची मुलं आहेत म्हणजे हे काम वाढतच जाईल व बरेचसे लोक पार होतील. पण जर माझ्या जीवनकाळातच काही विशेष गोष्टी झाल्या तर मला जरुर संतोष वाटेल. आपल्या जीवनातच काही प्राप्त झालं. यासाठी जसजसे वय वाढते आहे, तसतशी तुम्हा लोकांची जबाबदारी वाढत आहे, की आईच्या जीवन काळातच आम्हाला काही करून दाखविले पाहिजे. जसे आम्ही सहजयोग वाढविला तशी तुम्ही सहजयोगाची कमाल आम्हाला जीवनात दाखविली पाहिजे. जसे नॉईडाला सेंटर चालू झाले, फारसे अवघड नाही, अजून थोडे दूर जा. हरियानाकडे जा, यु.पी.कडे जा. आईला हेच दाखवा की आम्ही अशा अशा ठिकाणी सेंटर्स उघडली आहेत. हेच आम्हाला हवे आहे. फुलं मला फार आवडायची पण ती तुम्ही इतकी आणता की त्याचेही काही आता राहिले नाही. आता येवढेच ऐकायचे आहे की तुम्ही कुठे कुठे उद्यान, बगीचे, (सहज योग्यांचे) उभारले आहेत. पहिल्यांदा सहजयोगी नव्हते तर फुलांकडे बघत होते आता तुम्ही आहात तर फुलांकडे कोण बघणार. पण आता तुम्ही असे बगीचे उभे केले पाहिजेत काही लोक इतके छान असतात की जेथे बदली होईल तेथे ते सहजयोगाचा प्रसार करतात. मग ते अमेरिकेत जावोत वा जपानला. सहज योग हेच त्यांचे जीवन असते. जोपर्यंत सहजयोग हे तुमचे जीवन होत नाही तोपर्यंत तुम्ही त्याला पूर्णपणे मिळवू शकत नाही. तुम्हीही तुमचा वाढदिवस मनवा व वर्षभरात प्रगती करा. दिल्ली हे फार महत्वाचे ठिकाण आहे. सर्व जगातील लोकांचे इकडे लक्ष आहे. इथे सहजयोग वाढला पाहिजे. हिंदी भाषकांप्रमाणेच इतर भाषिकांपर्यंत तुम्ही पोहोचले पाहिजे. रोज विचार केला पाहिजे की आज आपण सहज योगासाठी काय केलं? तुम्ही सर्व काही माझ्यावर सोडा. जोपर्यंत तुम्ही स्वतःच काही करतो म्हणता तो पर्यंत ते होत नाही, म्हणून पूर्णपणे माझ्यावर सारे सोपवा. आता आपल्याला माहितच झाले आहे की मी कोण आहे - पण ते अजून तुमच्या जाणीवेत आले नाही. जर जाणीवेत असले तर कसली चिंता?

आदिशक्ती कोणासमोर बसून बोलली आहे असे कधी इतिहासात तरी झाले आहे का? कुठेच नाही. तुम्ही जाणता की मी आदिशक्ति आहे व तुम्ही माझी मुले आहात. तर तुम्ही कसे असले पाहिजे? सहजयोग तुमचे जीवन आहे. तो पूर्णपणे अंगी बाणवा व त्याच्यामुळे प्रकाशित व्हा. इतरानाही प्रकाशित करा. हाच माझा तुम्हा सर्वांना आशिर्वाद.

०००

**आपण इतरांचे वर मतप्रदर्शन करू नये.**

माणसाची चांगली बाजू का पाहू नये? वाईट बाजू पाहून ती आपल्याला सुधारता येत असल्यास ठीक आहे. पण त्यात सुधारणा करणे शक्य नसल्यास तुमही स्वतःच वाईट होता. सुधारणा करता आल्यास फारच चांगले, पण तुम्हाला जमणार नाही.

शिवाय लोक नेहमी म्हणतात, "मी नसते ते केले" परंतु तुम्ही दुसरे काहीतरी केले ते इतर करणार नाहीत.

दुसऱ्यांची परीक्षा करतेवेळी प्रथम स्वतःची परीक्षा करायला हवी, हे समजले पाहिजे. कशाच्या आधारावर तुम्ही परीक्षा करता? तुमचा अहंकार आणि मन हा दोष सगळीकडे आहे, हे मी पाहिले आहे. येथून पुढे तो अजिबात असू नये.

पण तुम्ही एक दुसऱ्याचे दोष पहाणार नाही तर चांगले गुण पहाणार आहात."

- श्री माताजी २८-७-८५

जेव्हा मी सहजयोगीच सहजयोग्यांवर टीका करताना पाहते त्यावेळी मला आश्चर्य वाटते, कारण तुम्ही एकाच शरीराचे अंग प्रत्यंग आहात. मी टीका करू शकते ते ठीक आहे. पण तुम्ही का करता? तुम्ही फक्त एक करायचे की एक दुसऱ्यांवर प्रेम करायचे. ख्रिस्तांनी हे तीन वेळा सांगितले, मी आतापर्यंत एकशेआठ वेळा सांगितले आहे, की तुम्ही एकमेकांवर प्रेम करा. तुमच्या मधील कारूण्य व्यक्त करण्याचा हा एकच मार्ग आहे. मी जर तुम्हाला केव्हा तरी प्रेम दिले असेल तर तुम्हाला इतरांबद्दल पेशन्स (धीर) व प्रेम असायला हवे.

- श्री माताजी ७/८५

"दुसऱ्याची परीक्षा करू नका, म्हणजे तुमची होणार नाही, तुम्हीजशी दुसऱ्याची परीक्षा कराल तशीच तुमचीही होईल."

- श्री येशू